

# अजिंठा

नियतकालिक

LIBRARY
RECEIVED
Date 31/5/88
Signature

134

● मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव ● १९८७-८८

प्रमुख संपादक - प्रा. शरच्चंद्र छापेकर ★ विद्यार्थी प्रतिनिधी - निवृत्ती खडके, निळकंठ

* टी. व्ही.
* रेफ्रिजरेटर्स
* कूलर्स
* वॉशिंग मशिन्स

चैन नव्हे !
दैनंदिन गरजेच्या
वस्तू

* ओ व्हनस्
* मिक्सर
* वॉटर फिल्टर्स
* टेपरेकार्डर्स्

अधिकृत विक्रेते

- केल्ट्रॉन, ओनीडा, कोणार्क
  ऑर्सन, ऑप्टोनिका, PHX टेलीव्हिजन
- बजाजची विद्युत् व घरगुती उपयोगाची उपकरणे
- फिलिप्स ट्रांझिस्टर्स व टेपरेकॉर्डस्
- महाराजा मिक्सर

सर्व प्रकारची होम अप्लायन्सेस

**हेमराज एजन्सीज** & **हेमराज इलेक्ट्रॉनिक्स**

१४ स्टेडियम शॉपिंग सेंटर, स्टेट बँकेसमोर, जिल्हा पेठ
जळगांव ४२५००१ • फोन : ३६३६, ५४६७

KNOWLEDGE IS POWER

LIBRARY
RECEIVED
Date 31/5/88
Signature

139

# अजिंठा

नियतकालिक १९८७-८८

मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

प्रमुख संपादक
प्रा. शरच्चंद्र छापेकर

विद्यार्थी प्रतिनिधी
निवृत्ती खडके
निळकंठ खडके

## संपादक मंडळ

प्रा. शरच्चंद्र छापेकर
प्रा. एस्. एस्. पाटील
प्रा. डॉ. सौ. प्रमिला भिरुड
प्रा. शा. न. पाटील
प्रा. डॉ. एन्. डी. पाटील
प्रा. ए. बी. पाटील
प्रा. एन्. डी. चौधरी
प्रा. अकबर रहमानी

## विद्यार्थी प्रतिनिधी

निवृत्ती खडके
निळकंठ खडके

मुद्रक :
मे. आनंद प्रिंटर्स
जळगाव

प्रकाशक :
प्राचार्य द. स. नेमाडे
मु. जे. महाविद्यालय, जळगाव

## संपादकीय,

आंजंठा नियतकालिकाचा 1987-88 चा अंक आपल्या हाती देतांना विशेष आनंद होत आहे· महाविद्यालयीन नियतकालिकाचा प्रमुख उद्देश म्हणजे या नियतकालिकाव्दारे विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या ललित कलाकृतींना अधिकृत असं व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा असतो· महाविद्यालयातील वर्षभराच्या कार्यक्रमांचा, उपक्रमांचा, शिक्षणविषयक आणि अभ्यासेतर हालचालींचा परिचय सर्व संबंधितांना करून देण्याचा प्रयत्नही नियतकालिकाच्या माध्यमातून साध्य करता येतो·

हा अंक आपल्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर केलेले लिखाण, त्यांच्या प्रतिभेचा परिचय आपणास करून देऊ शकेल· महाविद्यालयीन जीवन म्हणजे एक चैतन्य-स्तोत्रच। वर्षभर शिक्षण, क्रीडा, कला, साहित्य, संगीत,समाज सेवा यासारख्या विविध प्रांतात, विद्यार्थी जे भरघोस अन् विपुल कार्य करतात· नवी दालने, नवी क्षितिजे गाठण्याचा प्रयत्न करतात· त्याबद्दलची तपशिलवार माहितीही आपणा सर्वांस होऊ शकेल·

अंकाचे मुखपृष्ठ आपणांस नक्कीच आवडेल· खान्देशात निवास करून असलेल्या एका ख्यातकीर्त अन् आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या कलेची पताका फडकविणा-या एका थोर कलामहर्षीची, माननीय श्री केकी मूस चाळीसगाव यांची ती एक हृदयंगम कलाकृती आहे· तुम्हा आम्हा भारतीयांचं श्रध्दास्थान असणा-या पवित्र गंगेची ती प्रतिकृती आहे· आमच्या जीवनात, आचरणात या पवित्र गंगेसारखा पारदर्शीपणा, सहिष्णुता, आणता आली तर आपल्या अन् इतरांच्या ही जीवनांत "आनंदाचे डोह" नाही का निर्माण करता येणार? या चित्राला मुखपृष्ठावर स्थान देण्याची परवानगी आदरणीय श्री केकी मूस यांनी दिल्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत·

या अंकाचे अंतर्बाह्य स्वरूप नेटके करण्यासाठी अनेकांचे परिश्रम कारणीभूत आहेत· अंकाची सजावट करणारे श्री रविंद्र चित्ते, छपाईची सर्वंकष जबाबदारी सांभाळणारे मे आनंद प्रिंटर्स चे सर्व भागीदार, व्यवस्थापन, कर्मचारी, आपले जाहिरातदार, अंकाचे लेखक, छायाचित्रकार या सर्वांचे आभार।

आपल्या सर्वांच्या प्रेरणेने हा अंक साकारला· यात जे जे म्हणून काही चांगलं असल्याचं आपणाला जाणवेल ते आपणा सर्वांचे, त्रुटी असतील त्या आमच्या, त्याबद्दल कृपया क्षमस्व!

आपणा सर्वांसाठी आमच्या शुभेच्छा।

शरच्चंद्र छापेकर



## अजिंठा - स्पर्धक मंडळ

बसलेले (डावीकडून) प्रा. डॉ. सौ. भिरूड, निळकंठ खडके (विद्यार्थी प्रतिनिधी), उपप्राचार्य येवले, प्राचार्य जेमोडे
प्रा. शरच्चंद्र छापेकर, निवृत्ती खडके (विद्यार्थी प्रतिनिधी)

### आमचे नवे उपप्राचार्य



**श्री. पी. एल. कोल्हे**

### आशियाड कुस्तीसाठी तांत्रिक समितीवर निवड



**प्रा. नारायण खडके**

### विद्यापीठ प्रतिनिधी



**किरण अत्तरदे**

# वाङ्:निर्णय

आशा चौधरी
एम. कॉम.

सरिता एकटीच गावाहून घरी निघाली होती· एकटीने प्रवास तसा ब-याच वेळा केलेला असल्यामुळे गोंधळण्याचा किंवा घाबरण्याचा प्रश्न नव्हता·एस्·टी·मध्ये बसल्यावरही ती आरामात इतर लोकांची गडबड,धांदल मजेत बघत होती· गाडीतली गर्दी वाढत होती·मधुनच लेमन आणि खारे शेंगदाणे वाले ही हजेरी लावत होते·

गाडी सुटली तशी तिची नजर गाडीतल्या लोकांऐवजी खिडकीबाहेर भिरभिरू लागली·इतका वेळ सगळ्या लोकांचं निरीक्षण करणारी ती, पण् आपलंही कोणीतरी अगदी बारीक निरीक्षण करतोय् याचं अजिबात भान नव्हतं स्वारीला। खिडकीबाहेरची निसर्गदृष्य बघण्यात ती अगदी गुंग झाली होती·कशासाठी तरी गाडी एकदम थांबली आणि निसर्गाशी एकरूप होऊ बघणारी ती एकदम जागी झाली·तिनं गाडीत बघितलं· गाडीला अचानक ब्रेक लागल्यामुळे गाडीतले सगळेच लोक डिस्टर्ब झाले होते·सरितेच्या चेह-यावर थोडसं स्मित पसरलं·परत खिडकी बाहेर ती बघणार तोच तिला जाणवलं समोरच्या सीटवरचा तरूण आपल्याकडे अगदी एकटक बघतोय्·तिनं पाहीलं न पाहीलसं करून बाहेरची झाडं बघण्यास सुरुवात केली·थोडया वेळाने तिने हळूच त्याच्याकडे पाहीलं,कारण कुणीतरी आपल्या कडे बघतंय,खरंच बघतंय की आपल्याला भास झाला ही अनिश्चितता तिला स्वस्थ बसू देईना· तो अजूनही तिच्याचकडे बघत होता·तिने पुन्हा बघितल्यावर तो हसला।

त्याच्या हसण्यांत गोडवा होता, ओळख असल्याची ग्वाही होती·तिला त्याचा चेहेरा कुठेही पाहील्यासारखा वाटेना·आणि तो मात्र ओळख दर्शवित होता·काय करावं!हसून ओळख दाखवावी की ओळख नसताना आपल्याकडे बघून हसणा--या त्याच्याकडे रागाने बघावे?सरितेला लवकर उमजलंच नाही·तिच्या चेहे-यावरचा गोंधळ पाहून तोच सरिताकडे पाहून म्हणाला,"नमस्ते"·नकळत तिनेही नमस्कार केला·"मी अविनाश खरे,तुम्ही मला कदाचित ओळखलं नसेल पण मला वाटतं नाव सांगितल्यावर................!

"हो,मधे माझ्या नावावर तुमचं पत्र आलं होतं·"तिला एकदम आठवलं·त्या पत्राने घरातल्या सगळ्यांचीच कशी हसून हसून मुरकुंडी वळली होती·

"तुम्हाला राग आला का ? अविनाश

" अं ? राग...........नाही आला,पण........

"पण यावर विचार करावा असंही वाटलं नाही,खर नां ? अविनाशने तिचे अर्धवट वाक्य पूर्ण करीत म्हटले·

अं·हो-नाही.......ती अधिकच गोंधळली·तिच्या चेह-यावरचे झरझर बदलणारे भाव बघून त्याला खूप गंमत वाटली·तिचा लोभस वाणा चेहरा तो बघतच राहिला·

त्याला नेकमे काय उत्तर द्यावे,तिला कळेचना· सरिताची खूप चलबिचल झालेली पाहून तो म्हणाला,"त्यादिवशी स्त्री मुक्तीच्या व्यासपीठा वरून आम्हा पुरुषांना फाड फाड बोलणा-या तुम्हीच की दुसरी अजून वेगळीच अशी शंका येतेय मलां·तिने प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे बघितले·तिची नजर फार तीक्ष्ण होती·कॉलेजमध्ये मागे मागे करणा-या मुलांना तिची एकच नजर चार हात अंतर राखण्यास भाग पाडे·आता मात्र त्याच्या रोखून पहाण्याकडे ती एक मिनीट सुध्दा नजर देऊ शकली नाही·तिने पट्कन खाली मान घातली·

त्याच्या नजरेसमोर व्यासपीठावर हातात माईक घेऊन उभी राहीलेली सरिता आठवली·



व्यासपीठापासून ब-याच दूर असूनही तिचा सावळा गोल चेहरा त्याच्या चांगलाच लक्षात राहीला·तशी चार चौघींसारखीच तर होती·पण तरी ती नेमकी का आवडली? या प्रश्नाचं उत्तर त्याला आता इतक्या जवळून निरीक्षण केल्यावर सापडलं·तिचे डोळे विलक्षण तेजस्वी होते·एरवी गप्प असताना ती कुणाला आवडेल एवढी सुंदर नव्हतीच मुळी पण एकदा बोलायला लागल्यास तिच्या ओघवत्या,ओजस्वी वाणीची छाप ऐकणा-यावर पडे तिलाही याची जाणीव होती· अनेकदा तिच्या मैत्रिणी म्हणत,"ए तू किती छान बोलतेस ग । तुझ बोलणं अगदी ऐकत राहावसं वाटतं·एकदा मनीषा,तिची मैत्रीण,तिला म्हणाली होती,"मला काल ना आमचे एस·पी·चे·सर भेटले होते·"बरं मग ? पण तुमचे सर कोणते? दोघी मैत्रीणी असल्या तरी त्यांच्या डिव्हीजन वेगळ्या होत्या·

"ते तुझ्या विषयी खुप बोलत होते" ।

"बापरे । काय बोललेत ग?.....आणि माझा त्यांचा काय संबंध।मी तर एकदासुध्दा त्यांच्याशी बोललेले नाही·"

"अग ते म्हणत होते,"तुमची मैत्रिण किती हुषार आहे।शिवाय बोलतेही खूप छान ।"मग मी त्यांना म्हटलं,"पण सर तुम्हाला कसं ठाऊक·तुम्ही त्यांना कुठे शिकवतात?" तर सर म्हणाले,अहो त्यांच्या वर्गावर जाणारे प्रत्येक प्राध्यापक त्यांच्या विषयी स्टाफरूममध्ये बोलत असतात·

"मग मैत्रिण कुणाची आहे म्हटलं। मी आपली माझी कॉलर ताठ करून घेतली·मनीषा असं म्हणाली मात्र आणि दोघी खूप हसल्या होत्या·

कुठल्या तरी स्टँडवर गाडी थांबली तसं अविनाश आणि सरिता दोघेही आपल्या विचारातून जागे झालेत·गाडी तिथे बराच वेळ थांबणार होती·फेरीवाल्यांच्या आवाजाने गाडी भरून गेली·अविनाश खाली उतरला·तिला खूप हायसं वाटलं·थोडा वेळ का होईना दोन डोळ्यांच्या तुरुंगातुन सुटका झाल्यासारखी वाटली।

त्याच्या जागेवर ठेवलेल्या त्याच्या सूटकेस कडे सरिताचे लक्ष गेलं·त्यावर टपो-या अक्षरात त्याचं नाव लिहीलं होतं·अक्षर बहुधा त्याचेच असावे·कारण ते पत्रातल्या अक्षराशी जुळत होते· पत्राची आठवण झाल्यावर तिला नकळत त्या पत्रातला मजकूर आठवू लागला·त्याने लिहीले होते·"तुमचं परवाच्या वत्कृत्त्व स्पर्धेच्या वेळचं भाषण फार आवडलं·स्त्री मुक्तीच्या संदर्भात तुम्ही अनेक मुद्दे मांडलेत·त्यात मुलीला लग्नासाठी मुलांकडच्या मंडळीना दाखवून घ्यावं लागतं आणि ते भयंकर अपमानास्पद आणि लाजिरवाणं असतं· मुलीच्या मनाचा कुणी विचार करत नाही·तिच्या वर हा प्रसंग का आणला जातो? तिचे नाव, जन्मनाव,पत्रीका,शिक्षण इतकी सगळी साग्रसंगीत माहीती असतांना,"मुली तुझं नाव काय?शिक्षण माहीत असतानाही विचारतात, तू कुठपर्यंत शिकलीस? याहून कहर केला जातो तो त्यानंतर जेव्हा मुलाच्या पूज्य मातोश्रींना आणि पिताजींना मुलगी पसंत पडते आणि त्यांचे लाडके चिरंजीव तिला बघायला येतात तेव्हा पायापासून डोक्या पर्यंत मुलीच्या फिगरचा अंदाज घेणारी त्यांची किळसवाणी नजर ।एवढं सगळं सहन करूनही ती त्या अत्याधुनिक मुलाला पसंत पडेलच असं नाही·तिच्यात अनेक उणीदुणी काढली जातात· कधी ती सावळी ठरते·तर कधी फार बुजरी, कधी ठेंगू वाटते म्हणून·नजरेला नजर भिडवून भराभर उत्तरं दिलीत तर नको इतकी धीट, मर्यादा नसलेली अशी तिची अनेक उणीदुणी काढून तिला नाकारलं जातं·हे एकदा नव्हे अनेकदा·असं का? या कां च उत्तर या सभेतील एकतरी तरूण मला देईल का?"

"तुम्हाला त्या कां"च उत्तर एकाही तरूणाने दिले नाही·तुम्हाला त्याची अपेक्षाच नसावी·कारण पुढे तुम्ही म्हणाल्यात की,"माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळवणं एवढीच माझी इच्छा नाहीये तर त्याही पुढे जाऊन माझी एक आंतरीक इच्छा मला इथे व्यक्त करावीशी वाटते·ती म्हणजे मला एखादया तरूणाला अद्दल घडवायचीय"तेव्हा सगळ्यांच्याच चेह-यावर प्रश्नचिन्ह होतं·एवढीशी ही पोरगी तरूणांना कशी आणि कोणती अद्दल घडवणार म्हणतेय्? त्या सर्व प्रश्नार्थक चेह-यांमध्ये माझाही चेहरा होता·तुम्ही म्हणत होत्या·"मला ही लग्न करताना "वर" म्हणून उभ्या राहाणा-या मुलाला बघायला जायचंय,त्यालाही असेच आडवे तिडवे प्रश्न विचारायचेत्·एक तरी संधी मला मिळावी"·

"तुम्ही खूप मनापासून बोलत होत्या·तरी सुध्दा तुमची ही चाकोरीबाहेरील इच्छा ऐकून सभेतल्या तरूणांमध्ये हास्याची प्रचंड लाट उसळली आणि तरूणींच्या चेह-यावर कुतुहल मिश्रीत

आश्चर्य पसरलं·नळकत प्रत्येकीने कबूल केलं,"यू आर ग्रेट गर्ल" खोटं वाटेल वाचून,मी सुध्दा कबूल केलं·कार्यक्रम संपल्यानंतर निव्वळ केवळ कुतुहलापोटीच तुमचं नाव आणि पत्ता तिथल्या कार्यकर्त्यांना विचारले तेव्हा माझ्या मनात तुम्हाला मी हे असं पत्र लिहीन असं चुकूनही आलं नव्हतं·

कधी कुणाच्या वक्तृत्वावर गंभीरपणे मी कधीच विचार केला नव्हता·तुमचे विचार मात्र मनातून कितीदा हाकलले तरी ते आपले येतच राहीले आणि मला सतावितच राहीले. "खरंच,तुम्हा मुलींना,"दाखविण्याचा" कार्यक्रम एवढा अपमानास्पद वाटतो "? मला आतापर्यंत वाटत होतं की मुलीसुध्दा वरवर नाही म्हणत असल्या तरी त्याही उत्सुक असतात· कथा कादंब-यांमध्ये, सिनेमामध्ये घडलेल्या मुलींच्या मनाच्या दर्शनावरून तर असं वाटलं होतं की अशा काही घटना,प्रसंग असलेत की त्या लाजता आनंदाची गोड शिरशिरी त्यांच्या अंगावर उठते· त्याचवेळी आपल्या भावी पतीला पहाण्यास त्याही उत्सुक असतात·माझ्या या सर्व कल्पना तुमच्या वक्तृत्वामुळे वास्तवाशी अगदीच कशा विसंगत होत्या हे प्रकर्षाने जाणवले·

मी सैन्यातला एक रांगडा सैनिक,कोमल आणि हळुवार हे शब्द फार क्वचित वापरतो·आम्हाला विशेषतः तुम्हा स्त्रियांच्या या अशा भावनांचा फारच्च थोडा,कदाचित नाहीच संबंध ! दोन महिन्यांची रजा घेऊन मुद्दामच इकडे आलो होतो·जमलंच तर लग्न करूनच जाव म्हणून·दोन तीन मुली बघीतल्या देखील·अजून कुणालाच निर्णय कळवला नाहीये·मी सारासार विचार करून त्यातल्या त्यात चांगली मुलगी पसंत करेन अशी घरच्या लोकांची अपेक्षा आहे·त्यादिवशी तुमच्या सभेला हजर नसतो तर कदाचित नव्हे नक्कीच मी एकीला होकार कळवून टाकला असता·पण तेव्हा नाही आलेत ते प्रश्न आता मनात उभे राहातात, मी पसंत करणा-या त्या मुलीला माझं सैन्यातल रिस्की जीवन पसंत असेल का? माझा सावळा रंग तिला भावेल का? की आई वडीलांची पसंती ती आपली पसंती मानून तुमच्या म्हणण्याप्रमाणे मनाचा कोंडमारा करून ती माझ्याशी संसार करण्याची मनाची तयारी करेल? जाऊदे कुठेतरीच भरकटलो ना?

एक विचारू? तुम्ही कधी तुमच्या बाबतीत विचार केलाय? आणि केला नसेल तर माझ्या बाबतीत कराल? मी········ मला तुमच्या अगदी सर्व अटी मंजूर आहेत·अगदी तुम्ही म्हणता तसा "मुलाला"बघायचा प्रोग्रॅमसुध्दा घडवून आण ऑफकोर्स तुमची इच्छा असेल तर

"मिस्·······" अविनाश हळूच हाक मारत होता·

अं? तिची विचारांची तंद्री भंगली·

"कुठे गेल्या होत्या हो ?

"कुठे नाही,इथेच तर बसलेय" ती गोंधळली·

"खोटं,मनाने कुठेतरी दूर जाऊन आलात·होय नं? मी आपला केव्हाचा हाका मारतोय·

चोरी पकडली गेल्यासारखी ती एकदम लाजली·

"चहा घेणार?"

"नको,आणि आता गाडीही सुटण्याची वेळ झालीय·

"त्यांची काळजी नको,गाडी फेल झालीय·दुरूस्त व्हायला एक तास लागेच· चला ना,प्लीज.

त्याच्या आर्जवी स्वराने तिला उठावच लागलं· चहाचं ते एक निमित्त होतं·त्या अर्ध्या तासात त्याने आपल्या विषयी सगळी माहिती तिला सांगीतली·खिशातच असलेलं आयडेंटीटी कार्ड पण दाखवलं·तीही त्यात रस घेत होती·उत्सुकतेने सैनिकी जीवनातले प्रश्न विचारीत होती·अविनाश ही आवडीने त्याचं निरसन करीत होता· संभाषणाची गाडी त्याने मोठया कौशल्याने त्याच्या पत्राकडे वळीवली·तिच्या लक्षातही आले नाही· त्याने जेव्हा अचानक प्रश्न विचारला·

"मग तुम्ही काय विचार केला?

ती गोंधळली·त्याचं पत्र आलं तेव्हा तिच्या लग्ना विषयीचा प्रस्ताव साधा तोंडीदेखील घरात कोणी मांडला नव्हता·तिनेही फार खोलात जाऊन त्या संबंधी विचार केलाच नव्हता·

तुम्ही उत्तर नाही दिलत?······अविनाशने पुन्हा विचारले

"तेव्हा खरं म्हणजे माझ्या लग्नाविषयी मी इतका सीरीयसली विचार केला नव्हता·आणि········



आणि काय? सरीता प्लीज स्पष्ट बोल नं···

"तेव्हा तुम्ही मला संपूर्ण अनोळखी होतात·पत्रातून करून दिलेल्या ओळखीवर कितपत विश्वास ठेवायचा असं पप्पापण म्हणाले·मग हा विषय बाजूलाच पडला·

ओह ! तो नकळत उद्गारला·

आत्तापर्यंतच्या त्याच्याशी झालेल्या बोलण्यातून त्याच्या स्वभावाचे अनेक पैलू सरीताच्या निदर्शनास आले होते·स्वतःच्या क्वालिफिकेशनच आयकार्ड त्याने मघाशीच दाखवल होतं·तसं नकार देण्याजोग त्याच्यात काही नव्हतंच·दोघेही गप्प होते·त्यांना जास्त काळ तसं बसावं लागलंच नाही कारण कंडक्टर ओरडत होता,चला गाडीत बसा· दोघेही आपापल्या सीटवर येऊन बसली·दोघां मध्ये एक अनामिक मौन स्थापित झालं होतं· ब-याच वेळाने त्यांच गाव आलं तेव्हा सरीता त्याला म्हणाली,तुमचा पत्ता लिहून देता।

क्षणभर त्याने प्रश्नार्थक नजरेने तिच्याकडे बघितलं·त्याच्यातला गर्भित अर्थ लक्षात आला तेव्हा त्याचा चेहरा एकदम उजळला·म्हणजे····तू सरिता·······? त्याला शब्दही सुचत नव्हते·

तिने खाली बघत हळूच मान हलविली होकारार्थी·एक लाजरं बुजरं स्मित तिच्या चेह-यावर होतं·तिच्या कानाशी तोंड नेत त्याने हळूच विचारलं,"बघायला येणार आहेस?" तिने एकदम वर बघीतलं,तो मिस्किल हसत होता·

गाडीतून उतरल्यावर ती म्हणाली, "या आठवडयातच पप्पांना पाठवीन तुमच्याकडे"·

"तू पण ये नां" मी चहाचा ट्रे हातात घेऊन उभा राहीन तुझ्या समोर,मग तू विचार,मला तुझं नाव काय?

ए,आता पुरे ना,किती चिडवशील·तो मोठयाने हसला·तिला रिक्षात बसवून दिल्यावर तो म्हणाला,बरंय आपण लवकरच भेटणार आहोत, होय ना?

त्याचा निरोप घेताना सरितेला लागलेली हुरहुर तिची तिलाच अपरिचित होती·घराकडे जाताना प्रित,दुरावा,निरोप या शब्दाचा एक अनोखा अर्थ गवसत होता·

# शपथ

**जयंत फडणिस**
बारावी वाणिज्य

अरे ! थांबणा-या वा-यांनो
तुम्हाला शपथ आहे माझी
तुम्ही वहातच रहा
जगाला सुखवत रहा

अहो ! थांबणा-या लाटांनो
तुम्हा शपथ आहे सागराची
तुम्ही खळखळत रहा
किना-यांना स्पर्श करत रहा

अरे !, उमलणा-या फुलांनो
तुम्हाला शपथ आहे कळ्यांची
कोमेजून जाऊ नका
सा-यांना सुवास देत रहा

अरे ! थांबणा-या चंद्रा
तुला शपथ आहे चांदण्यांची
लपू नकोस ढगामागे
जगाला प्रकाश देत रहा

अरे ! माझ्या काव्यांनो
तुम्हाला शपथ आहे साहित्याची
तुम्ही माझ्या मनी वसा
जगाला काव्यमय करण्यासाठी

अरे ! माझ्या चंचल मना
तुला शपथ आहे त्या प्रियेची
तू मात्र शांत रहा
तिची आठवण मनी साठवत जा

# अवर्षण एक राष्ट्रीय आव्हान

निवृत्ती खडके
तृतिय वर्ष कला
भूगोल विभाग
मॅगेझिन सेक्रेटरी

सतत येणारी अवर्षणे म्हणजे भारतासमोर आलेले फार मोठे आव्हान आहे·त्यातही अनेक राज्यांमध्ये पडलेला 87 चा दुष्काळ फारच गंभीर आणि व्यापक स्वरूपाचा आहे·काही राज्यांना तर लागोपाठ तिस-या किंवा चवथ्यांदा अवर्षणाचा फटका बसला आहे·या वर्षाच्या अवर्षणाची तुलना 1965 मधल्या अवर्षणाशी करता येईल·तात्कालिक स्वरूपाच्या अथवा वरवरच्या उपायांनी ही जटिल समस्या सुटणार नाही·त्यासाठी मूलगामी स्वरूपाच्या दीर्घ व अल्पकालीन अशा दोन्ही स्वरूपाच्या उपाययोजनांची गरज आहे·त्यासाठी भारत वासीयांच्या निष्ठेची,त्यागाची,दीर्घोद्योगाची कसोटीच लागणार आहे·

दीर्घकालीन उपाय योजनेत गंगेचे पाणी दक्षिणेत कावेरीपर्यंत नेण्याचे स्वप्न साकारण्याची गरज आहे·त्यामुळे देशाची सर्व जमिन भिजेल· घराघरात वीज व उद्योग पोहोचेल·देश ख-या अर्थाने सुजलाम्-सुफलाम् होईल·

त्याचप्रमाणे लाखो भूमीहीन,शेतमजूर,कामगार अल्प व अत्यल्प भूधारक व गरीब शेतक-यांना आवश्यक असलेली साधनसामुग्री पुरवून उत्पादन वाढ प्रचंड प्रमाणात झाली पाहिजे·त्याच प्रमाणे राज्य सरकारांनी केंद्र सरकारच्या कृषी, पाटबंधारे आणि वीज विभागांशी निकट सहकार्य करून सुनियोजित कृती करावयास हवी·अवर्षणा मुळे येणा-या वीज-तुटीला औष्णिक वीज निर्माण करून भरून काढले पाहिजे·तसेच भक्कम न्याय्य सार्वजनिक वाटप पध्दतींचा आपण पुरेपूर उपयोग केला पाहिजे·अवर्षण उपायांच्या बाबींना अग्रक्रम देण्याची आवश्यकता आहे· सरकारच्या जोडीला स्वयंसेवी संस्थांनी, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची योजना युध्दपातळीवर राबवायला हवी·गुरांच्या चा-याची समस्याही त्यांनी सोडवायला हवी·आजही या संस्थांच्या कार्यात मानवता व सामाजिक बांधिलकी दिसून येते·

अवर्षणामुळे केवळ तातडीचेच प्रश्न निर्माण होतात असे नाही तर दीर्घकालिन समस्याही निर्माण होतात·आपल्या नियोजन प्रक्रीये ने त्या संबंधीचा विचार करण्याची आवश्यकता आहे· अवर्षणामुळे पर्यावरणाचा दर्जाही सतत खालावत चालला आहे·जंगलांचा -हास ही एक गंभीर समस्या आहे·त्यामुळे आपणच आपल्या नाशाला कारणीभूत ठरत आहोत·

अवर्षण हे राष्ट्रीय आव्हान आहे·त्याला तोंड देण्यातच आपली सर्वांनी कसोटी आहे·1965 च्या अवर्षणाने एक मोठे आव्हान दिले होते· कै·इंदिराजींनी त्यामुळे पण केला की काहीही झाले तरी आम्ही अन्नधान्यासाठी दुस-यावर अवलंबून राहाणार नाही·आज आपण त्या दृष्टीने स्वावलंबी आहोत·

1987 च्या अवर्षणाने दिलेले आव्हान वेगळ्याच स्वरूपाचे आहे·या तुटीच्या वर्षाला कसे तोंड द्यायचे हे आपल्यापुढे आव्हान आहे·विशेषतः अवर्षणग्रस्त भागातल्या कृषी क्षेत्राला लहरी निसर्गावर अवलंबून राहावे लागू नये म्हणून प्रयत्न करणे व या एक वर्षाच्या अवर्षणामुळे निर्माण झालेला विकासाच्या गतीतला अडथळा दूर करणे हे आपल्या पुढे एक आव्हान आहे· यावर्षी अवर्षणाबरोबरच अनेक राज्यांमध्ये नद्यांना महापूर ही आले·त्याचा देखील राज्यांच्या विकासावर परिणाम झाला·यावर्षी पूर्वी बसला नव्हता येवढा धक्का बंगाल,बिहार,व आसामला बसला आहे·या पुरांमुळे या राज्यांची फार हानी झाली आहे·या आव्हानांना तोंड देण्याचे सामर्थ्य आपल्या अर्थ व्यवस्थेत आहे आणि ती पूर्ववत करण्याची क्षमता आहे·

त्यासाठी आपण या कार्याला सामाजिक संस्थां व्दारे आत्मविश्वासाने व निष्ठेने वाहून घेतले पाहिजे·सहभाग आणि सहकार्याच्या भावनेने या कार्याला हातभार लावल्यास आपण या राष्ट्रीय आव्हानाला सामोरे जाऊ शकू·



# यंत्र मानवाचे व्रत

निळकंठ खडके
द्वितीय वर्ष वाणिज्य
मॅगेझिन सेक्रेटरी

आटपाट नगर होतं·तिथं कांही विव्दान ब्राम्हण राहात होते·विव्दान असल्यामुळे अर्थातच दारिद्र त्यांच्या पाचवीला पुजले होते·पण त्या बद्दल त्यांना खंत नव्हती·त्यांचे दुःख वेगळेच होते·इतरांची दुःखे पाहून त्यांची आतडी पिळवटून जात·त्यांच्यावर आलेली संकटे पाहून त्यांची हृदये विदीर्ण होत· गोरगरिबांवरील अन्यायाने त्यांचे रक्त तापून उसळू लागे·अशा प्रकारे त्यांची आतडी सतत पिळवटल्या मुळे इतकी बारीक झाली की अन्नप्राशन करणे त्यांना अशक्य झाले·अनेकवार फाटल्याने त्यांची हृदये दुरूस्त होण्या पलीकडे गेल्याने, त्यांच्या अर्धांगीनींनी ती पुन्हा शिवून देण्याचे नाकारले· लाव्हारसा प्रमाणे सतत उसळणा-या रक्ताचा दाब त्यांच्या शरीराला सोसवेना झाला।

असे हे गलितगात्र दुःखी जीव संकट निवारण्याचा उपाय शोधण्यासाठी वनात जाते झाले। संध्यासमय उलटल्यावरही उपाय न सुचल्याने त्यांनी वनातच झाडांवर मुक्काम करायचे ठरविले·उत्तर रात्री झाडाखाली नागकन्या, देवकन्या प्रकट झाल्या व त्यांनी पूजाअर्चा करायची तयारी चालविली·तसे हे विव्दत्जन त्यांना पुसते झाले,"बायांनो!तुम्ही हे कोणते व्रत करीत आहात? त्याचे फळ काय? "देवकन्या उत्तरल्या "आम्ही हे यंत्रमानवाचे व्रत घेतले होते·त्याचे आज उद्यापन करीत आहोत· यंत्र मानवाची पूजा केल्याने उच्च प्रतीची निर्वीकारता प्राप्त होते·इतर जनांची दुःखे पाहून होणा-या वेदनांपासून मुक्ती मिळते·यंत्रमानव प्रसन्न झाल्यास त्याचे रूप प्राप्त होऊन मनुष्यप्राणी याची देही मोक्षाप्रत जातो

"महाजन" आनंदित होऊन म्हणाले,"देवी! आम्ही अशाच व्रताच्या शोधार्थ आज वनात आलो आहोत·कृपा करून हे व्रत कसे करायचे ते आम्हाला सांगावे·आम्ही उतणार नाही·मातणार नाही· घेतला वसा टाकणार नाही·"तशा त्या स्त्रिया म्हणाल्या,"तर मग हे व्रत तुमच्या कामाचे नाही· उतलात,मातलात तरच हे व्रत करू शकाल·"

तदनंतर समस्त जनांनी "ऊत-मात"करण्याचे वचन त्या स्त्रियांना दिले·व ते पुढे म्हणाले,"हे देवींनो!आमची अवस्था आपण पाहात आहातच· अशा स्थितीत हे व्रत आम्हाला करणे शक्य होईलसे वाटत नाही·आपणच आमच्यासाठी काही केले तर उपकार होतील·"तेव्हा नागकन्या देव कन्यांच्या मनांत ह्या हीनदीन जनांविषयी दया उत्पन्न झाली व यंत्रमानवाकडे शब्द टाकण्याचे त्यांनी मान्य केले·व्रताच्या सांगतेत या विव्दानांना सहभागी करून घेतले·पहाटे पहाटे यंत्रमानव अवतीर्ण झाले·नागकन्या देवकन्यांच्या सांगण्यावरून त्यांनी समस्त महाजनांवर आपली कृपादृष्टी फिरवली·

आणि काय आश्चर्य। त्यांच्या शरीरातील उसळ्या मारणारे तप्त रक्त बर्फाहूनही शीतल झाले·त्यांची हृदये दुरूस्ती पलीकडे गेली होती त्यांना '"अनब्रेकेबल" अशी अती चिवट पदार्थांपासून बनविलेली नवीन हृदये प्राप्त झाली सर्वांच्या मस्तकातील भुगा झालेला पुरातन मेंदू नष्ट होऊन त्या जागी सुबक,नेटक्या व आज्ञा धारक संगणकाची स्थापना झाली·

अशाप्रकारे नवजीवन प्राप्त झालेले हे भाग्य-वान् लोक नगरामध्ये परतले आणि त्यांना अति सुखद असे विस्मयजनक अनुभव येऊ लागले·मोठ मोठे अपघात होऊनही त्यांच्या हृदयाचा ठोका चुकेनासा झाला·अत्याचाराच्या बातमीने त्यांचे रक्त तापेनासे झाले। कुठल्याही अन्याय्य घटनेवर जळजळित प्रतिक्रिया व्यक्त करण्याची अक्षम्य चूक संगणकाकडून घडणे तर केवळ अशक्य होते·त्यांना मिळालेली हृदये सतत 48 तासांच्या तीव्र धक्क्या च्या चाचणी दिव्यातून बाहेर पडली असल्याने खून,दंगल,जाळपोळ,ह्या असल्या गोष्टीचे धक्के सहज पचवू लागले·जो मेला तो "इसम"जगला

तो "माणूस" अशी नोंद ठेवण्यात त्यांच्या डोक्यातील संगणक तरबेज झाले·मृतांची संख्या वाढली म्हणजे नोंदीसाठी जास्त जागा लागते,एवढे ते जाणू लागले ।

असे हे विव्दत्जन त्यांना प्राप्त झालेल्या निर्विकारतेमुळे लवकरच नगरश्रेष्ठी बनले व पर्यायाने चालून आलेल्या समृध्दीमुळे त्यांना आकंठ बुडलेले पाहून इतर नगरवासियांनी त्यांच्याव्दारे यंत्रमानवाकडे वशीला लावून त्याचे अभय प्राप्त करून घेतले·अशा प्रकारे सर्व नगरवासी सुखी होण्यात कोणतीच अडचण उरली नाही·

तथापि या नगरीत मूठभर वेडेपिसे असे निघाले की त्यांना उसळत्या तरुण रक्ताचा आणि धडधडत्या काळजाचा मोह सोडवेना·त्यांचा मेंदूही असा विचित्र की तो त्यांना यंत्रमानवाच्या नावाचाही व्देष करायला लावी।परिणामी हे "वेडेपीर" मधून मधून "नगरश्रेष्ठींचे मनःस्वास्थ बिघडविण्यासाठी कधीकधी घेराव,उपोषण,रस्ता रोको यांच्या आश्रयाला जाऊ लागले·बंदचे आवाहन करू लागले·

नगर श्रेष्ठींना या सा-या हालचालींपासून अतीव भय निर्माण झाले·तेव्हा नगरश्रेष्ठी पुन्हा अनन्यभावे यंत्रमानवाला शरण गेले·यंत्रमानवाने त्यांच्या डोक्यातील संगणकात दुरूस्त्या करून त्यांना परत धाडले·

आणि काय सांगावे महाराज। आता नगर श्रेष्ठी बंदलाही धूप घालीनासे झाले । नगर वासियांना तर वज्राहूनही कठीण असे कवच लाभले·"बंद"ची चाहूल लागताच सर्व नगरवासी चार भिंतीत दडून राहू लागले·ज्यायोगे महाकाय बंद देखील निष्प्रभ झाला । त्याच त्याच कारणांसाठी नगरानगरांमधून भ्रमंती करून करून बंदच्या पायाचे तुकडे पडायची वेळ आली·परंतु नगरश्रेष्ठींच्या पोटातील पाणीसुध्दा हलायचे चिन्ह दिसेना·बंदची पाठ वळायचा अवकाश सर्व नगरजन निष्क्रियपणे आपले व्यवहार करू लागत· एकदोन वेळा बंदने नगराबाहेर जाण्याचे नाटक करून पुन्हा नगरीवर त्वरीत आक्रमण केले·परंतु त्याहीपेक्षा कितीतरी पट अधिक चपळाईने नगर वासी व नगर श्रेष्ठींना सुक्षेम राखण्यात यंत्र मानव यशस्वी झाला·आणि मग मात्र पराभूत आणि अपमानित असा हा बंद नगरीतील मूठभर वेडयापिरांसमोर जाऊन उभा राहिला· आणि शरमिंदा सुरात म्हणाला,"लोकहो,आता मी थकलो आहे· या बलाढय यंत्रमानवी शक्तीपुढे मी हतबल झालो आहे·आपण मला पुनश्च पाचारण करून वृथा कष्ट देऊ नये·आपल्या सेवेतून मला मुक्त करावे व माझ्या जागी दुस-या सक्षम अशा ब्रह्म-समंधाची नियुक्ती करावी·पण असा कोणी समंध न आढळल्यास यंत्रमानवास शरण जाऊन त्याचे अभय प्राप्त करून घ्यावे·त्यातच तुमचे अंतिम हित सामावले आहे·"

एवढे बोलून त्या मूठभर लोकांना संभ्रमावस्थेत तसेच ठेवून बंद नामक ब्रह्मसमंध अंतर्धान पावला·अशी ही ऐशी कोटी प्रश्नांची एक अनुत्तरीत कहाणी ।

# कोठे असणार

पौर्णिमा शिंपी
प्रथम वर्ष वाणिज्य

येत्या क्षणाला कोठे असणार तुम्ही···
गगनात मावेनाश्या आनंदात असणार तुम्ही···
पर्वत सारख्या दुःखात जाणार तुम्ही
कधी अप्सरेच्या बाहूत असणार तुम्ही
कधी त्या बाहूतून दूर जाल तुम्ही
कधी मातेच्या कुशीत असणार तुम्ही···
कधी मातेला तुडवाल तुम्ही··
कधी काही क्षणात भेदून गेलेल्या
व्यक्तींच्या अंत्ययात्रेत असणार तुम्ही
कधी सैतान असणार तुम्ही
कधी मानव असणार तुम्ही
कधी नकळत मृत्यूला सामोरे जाणार



# प्रदूषणाच्या छायेतील पृथ्वीची कैफियत

कु. सुधा नाईक
द्वितीय वर्ष शास्त्र

अजून आठवतेय ती रात्र। रात्र कसली? काळरात्रच होती जणू।प्रचंड गोंधळ।नुसता हाहाःकार।सारे सैरावैरा धावत सुटलेले·धडाधड वस्तू कोसळण्याचे आवाज आणि लोकांचे किंचाळण्याचे आवाज यांच्या· मिश्रणामुळे भयानक परिस्थिती निर्माण झाली होती·प्रथम तर काय घडलेय तेच कुणाला कळले नाही·परंतु लवकरच सा-यांच्या लक्षा हारे काय घडले ते आले·भूकंप। झाला होता धरणीला मोठया भेगा पडून त्यात लाखो माणसे गडप झाली होती·केवळ क्षणांचा खेळ झाला आणि केवढीतरी प्रचंड उलथापालथ होऊन गेली·जी माणसे जिवंत राहिली ती आपल्या दैवाला दोष देत शोक करीत होती·मुलेबाळे आणि सर्वस्व गमावलेला शोक संतप्त असा एक वृध्द तेवढयात धाय मोकलून रडू लागला·धरणीला बोल लावू लागला·"पृथ्वीमाते । आज अशी कशी वैरीण झालीस ग।मातेच्या नात्याला कलंक लावलास तू। कलंक लावलास।

"हेचि फल काय मम तपाला? मानवा। हेचि फल काय मम तपाला?"हुंदक्यांबरोबरच शब्द ऐकू आले लोक गोंधळले,इकडे तिकडे पाहू लागले· "अरे। असा कसा तू पुत्र ? आज मातेचा आवाजही तुला ओळखता येत नाही? मीच,ही धरणीमाताच आपली कैफियत मांडतेय·अरे,आज मातेला वैरीण म्हणालास तू।माझ्यावर पडणा--या असहय ताणांमुळे मी थोडी प्रतिक्रिया व्यक्त केली, तर लगेच मला तू दोष देतोस? इतकी वर्षे मी तुझे अन्याय,अत्याचार,अतिक्रमण सारे निमूटपणे सहन करतेय त्याची तुला काहीच का किंमत नाही ?बघ,माणसा।तुझ्या सा-या जगाकडे उघडया डोळ्यांनी जरा बघ·अरे,कसल्या त्या नरकासमान जगात तू आज राहतोयस।माझ्या भोवती सगळीकडे पसरलेली प्रदूषणाची छाया मला घुसमटून टाकीत·तुझ्या अविचारीपणामुळे एक दिवस माझे रूप भकास,उदास,दिसेल आणि मानवा,तू मात्र भुतांनी झपाटलेल्या स्मशान यात्र्याप्रमाणे भरकटशील·"माणूसपण" गमावलेल्या अवस्थेत भान हरपून सुरडत जगशील·ही मातेच्या अंतःकरणाची तळमळ आहे,भविष्याच्या कल्पनेने माझे मन सुन्न होतेय।"

"माझ्या भोवतीच्या वातावरणाची काय दशा करून टाकलीस,पुत्रा। त्या सूर्याकडून येणा-या अतिवेगवान घातक किरणांपासून माझ्या जीव सृष्टीचे रक्षण व्हावे म्हणून परमेश्वराने दिलेले हे संरक्षक आवरण तुझ्या प्रदूषण निर्माण करण्यामुळे हळूहळू विरळ होत चाललेय·विचार कर,जर अतिभयंकर जेथल्या तेथे जाळून टाकणारे अतिनील सूर्यकिरण भूतलापर्यंत पोहोचले तर सगळ्या जीवसृष्टीची काय अवस्था होईल? आज तुझ्या बेसुमार वृक्षतोडी मुळे माझ्याभोवतीच्या ओझोनचा थर कमी होतोय·अघटित घडू पहातेय केवळ तुझ्यामुळेच,तुझ्या अविचारानेच·"

"वाढत्या लोकसंख्येमुळे आणि कारखानदारी मुळे वातावरणातील वायूंचा समतोल ढळतोय· कार्बनचे प्रमाण वाढतेय आणि प्राणवायू अपुरा पडतोय·टोकियो सारख्या शहरात तर लोकांना दैनंदिन जीवनात सुध्दा श्वसनाकरिता प्राणवायूची नळकांडी वापरण्याची गरज भासावी यासारखे आणखी दुर्दैव ते कोणते? सगळीकडे नुसती बजबजपुरी बनलीय·प्रदूषणाचा बाजार भरलाय· हवाप्रदूषण,जलप्रदूषण,ध्वनीप्रदूषण। अरे,रक्तात सुध्दा प्रदूषणाचे थैमान माजलेय·

हवेत कार्बनचे आणि विषारी वायूंचे प्रमाण हळूहळू वाढत चाललेय··तुझ्या प्रगतीची व्याख्या किती विचित्र आहे·"वाढती कारखानदारी, वाढत्या औद्योगिक हालचाली म्हणजे प्रगती।" पण या प्रगतीबरोबरच हवाप्रदूषणामुळे आरोग्याच्या बाबतीत मात्र अधोगतीच होतेय ना।जगात आयुष्य घालवायचे असेल तर ते प्रथम आरोग्य संपन्न असावे·एकाची प्रगती जर शेजाऱ्याच्या प्राण

हानीने होत असेल तर तिचा काही उपयोग नाही".

"जीवन असं ज्याला संबोधलं जातं ते पाणीही आज जीवघेणं ठरलंय,का? उत्तर तुझ्याच कृत्यांत आहे माणसा।ज्या नद्या, झरे मला माझ्या गळ्यातील मौक्तिक माला वाटत होत्या त्या आज विषारी सर्पाचे विळखे वाटावेत इतक्या प्रदूषित झाल्या आहेत.अरे।काय नाही टाकत तू या जलात? कारखान्यातील निरूपयोगी द्रव्ये,विषारी रसायने,घाण,केरकचरा,मळी,आणखी कितीतरी टाकू नये ते त्या पाण्यात मिसळत राहते.नित्य दिवशी नवनवीन घातक गोष्टींची भर त्यात पडतेय आणि पुन्हा तेच जल पिण्यासाठी म्हणून वापरात आणले जातेय.काय ही दुर्दशा। त्या दूषित पाण्यातून किती रोगांचे जंतू शरीरात प्रवेश करीत असतात.त्यामुळेच तर आज विचित्र प्रकारच्या रोगांची लागण झालेली दिसून येतेय. फक्त माणसांतच नव्हे,मुक्या जनावरांचाही त्यात सहभाग आहे."

"कसा विचित्र योग आहे।आज जीवनच जीवनाला घातक ठरलेय.याला कारणीभूत तूच आहेस माणसा।अरे,कोणतीही योजना राबवतांना नाण्याच्या दोन्ही बाजूंचा विचार करायला हवा फक्त एकाच बाजूच्या चकचकीत पणावर भाळून कसे चालेल? पण आज तुझी सारासार विवेक बुध्दी काम करीत नाहीये."

"लोकसंख्या किती वाढलीय आज जगाची। एकेकाळी मानवाला आपल्या अंगाखांद्यांवर खेळवितांना मला सुख वाटे,कौतुक वाटे,पण आज भार असह्य होतोय.सुख नव्हे,वेदना होताहेत. इतक्या प्रजेची भूक भागविण्यासाठी,धान्यत्पादनाचीही भूक वाढणारच.दोन वर्षात येणारे पीक एकाच वर्षात आले तर फायद्याचे होईल.म्हणून माझ्या कणांवर,मातीवर वाट्टेल ते पदार्थ ओतत जाताहेत.कणभर फायद्यासाठी ढीगभर नुकसानीकडे तू दुर्लक्ष करतो आहेस पुत्रा।एकदा सुपीक ठरलेली माती अशा रासायनिक खते म्हणविल्या जाणा-या विघातक पदार्थांनी हळूहळू कस कमी होत जाऊन शेवटी नापीक होईल हे बघण्याची अघोरी इच्छा तर तुझ्या मनात नाही ना?उत्पन्न होणा-या अन्नावर सूक्ष्म कीटकापासून सा-यांचाच हक्क आहे.त्यांचा उपद्रव कमी करण्यासाठी उपाय योजले जावेत,पण आज जी कीटकनाशके वापरली जातात त्यांचा भयानक विषारीपणा पाहून त्यांना मानवनाशके,जीवनाशके म्हणण्याची वेळ आली आहे.चुकून सुध्दा या रसायनांचा थोडा अंश शरीरात गेला तर मृत्युलाच आमंत्रण!एकवेळ मृत्यु बरा,पण काही पदार्थ तर जिवंत माणसाला मरणप्राय यातना देऊन धड जगूही देत नाहीत वा मरणही देत नाहीत.विज्ञानाची शक्ती म्हणजे दुधारी शस्त्र आहे. शत्रू नष्ट करतांना ते आपल्यावरही उलटल्या वाचून राहत नाही.कुठल्याही शक्तीचा अति वापर विनाशच घेऊन येतो. पण मानवा,तू तर जास्तीत जास्त विषारी औषधे शोधण्यातच गुंतला आहेस."

"तुझ्या अनियंत्रित बुध्दीला मिळालेले आणखी एक हत्यार म्हणजे किरणोत्सारी पदार्थ.याचा एक अणुसुध्दा विश्वविनाशाला पुरेसा आहे.पण स्वतःच्या प्रतिष्ठेची प्रौढी मिरविण्यासाठी बडी राष्ट्रे या किरणोत्सारी पदार्थांपासून क्षेपणास्त्रे. अण्वस्त्रे बनवित आहेत.त्यांची गुप्त चाचणी भूमिगत रित्या होते तेव्हा केवढा प्रचंड दाह मला सहन करावा लागत असेल याची मूर्ख माणसाला कोठून कल्पना येणार?

"या किरणोत्सारी पदार्थांच्या वापरातून आणि अणुभट्ट्यांमधून निर्माण होणारा कचरा, राख,सारे काही माझ्याच पोटात किंवा सागरात फेकण्यात येते.अरे,माता जरी आपल्या मुलांचे सहस्त्र अपराध पोटात घालत असली तरी असले विघातक,विनाशकारी विश्वनाशी,अपराध कसे सहन होतील? ती अणुभट्टीतील राखसुध्दा प्रचंड प्रमाणात किरणोत्सार फेकीत असते.असे जर सतत होत राहीले तर माझ्या अंतरंगाचा स्फोट व्हायला कितीसा वेळ लागेल? अमर्याद हानिकारक असे हे पदार्थ मात्र मानवाला जणू खेळणीच वाटताहेत की काय?
हिरोशिमा आणि नागासाकी येथील या खेळण्यांचे प्रताप आणि झालेले अक्षम्य नुकसान यांचे ज्वलंत उदाहरण डोळ्यासमोर असून देखील मानवाचे डोके ठिकाणावर आलेले नाही. "विनाशकाले विपरित बुध्दी" म्हणतात ते हे असे."

"आणि आता भोपाळला दुसरे हिरोशिमा म्हणावे लागेल ते तिथे झालेल्या भीषण नरसंहाराने. कारखान्याच्या टाक्यातला तो विषारी वायू बाहेर पसरला आणि काही तासांत होत्याचे नव्हते करून टाकले.किती लोकांचे जीव गेले,किती लोक आज मरणाच्या दारात तर किती जण मरणाची वाट पहात असहाय जगत आहेत.इतका भयानक परिणाम त्या वायूमुळे झालाय की तिथल्या पुढच्या



पिढीचे जीवनही धोक्यात आले आहे.

सगळ्या क्षेत्रातील अशा प्रदूषणांमुळे माझ्या पर्यावरणात प्रचंड ढवळाढवळ होऊन असमतोल निर्माण झालाय.निसर्गाील साखळी खंडीत होत आहे.वन्य प्राण्यांचे,सुंदर पक्ष्यांचे जीवन नष्ट होत आहे.सारी जीवसृष्टीच धोक्यात आली आहे. परंतु एखादया समस्येने गंभीर स्वरूप धारण केल्याशिवाय मानवाचे तिकडे लक्षच जात नाही. म्हणूनच अजूनही मौल्यवान नैसर्गिक साधन संपत्तीची उधळपट्टी आणि नासाडी चालली आहे."

"माझी कळकळीची हाक ऐक,मानवा।अजूनही वेळ गेलेली नाही,जागृत हो,डोळे उघडून जगाकडे बघ आणि प्रदूषणाच्या या समस्या क्षुल्लक न मानता गंभीरपणे त्याकडे लक्ष दे.नद्यांना माता म्हणून नुसती त्यांची अंधश्रध्देने पूजा न करता त्यांच्यापाण्याचे प्रदूषण थांबवण्याचा प्रयत्न कर, पावसाचे प्रमाण अनियमित होत चाललेय त्याचं कारण म्हणजे जंगलांचा नाश.अरे ही हिरवळ, रानं वने म्हणजे वस्त्रे। पंण..............

"कुठार घेऊनी सज्ज जाहला दुःशासन हा
मातेलागी विवस्त्र करण्या पुत्र धजला
न्याय जगाचा पहा।
द्रौपदीची हाक ऐकली त्वां,नारायणा,
मी दाद मागू कुणा?

हिरवा शालू जळतांना शरमल्या मम मातृवेणा।."

माझी विटंबना कधी संपेल पुत्रा? कुणीतरी श्रीकृष्ण मानवजातीत निर्माण होणे अत्यावश्यक आहे.नाहीतर एका मातेच्या शापात सा-या विश्वाची होळी होईल.लोकसंख्या नियंत्रित झाली तर आपोआपच अन्नाची गरजही मर्यादित होईल. म्हणजे कीटकनाशके,रासायनिक खते,अशा विषारी पदार्थांचा वापरही थांबविता येईल. भौतिक प्रगतीच्या मृगजलामागे धावण्यापेक्षा आत्मिक समाधान शोधले तर जीवन अधिक सुंदर होईल"

"मानवा । पृथ्वीवर वाळवंट निर्मिण्याचे उद्योग करण्यापेक्षा तिचे नंदनवन बनविण्याचे प्रयत्न कर.कारखान्यांची आणि औद्योगिक संस्थांची प्रगती थोडी कमी करून मानसिक विकासाला वाव दे.सौंदर्यसृष्टी पुन्हा निर्माण कर. जरा तरुवेलींवर फुलणा-या त्या फुलांकडे बघ म्हणजे मानसिक आनंदाचा अनुभव येईल.अरे।सुख शोधता शोधता किती दुःखे मागे लावून घेतलीस आणि माझेही जीवन दुःखी केलेस.वन्य प्राण्यांचा अनमोल ठेवा जपून ठेव आणि त्यांचीही जोपासना कर.दुस-याला जीवन देण्याचे सुख महान् आहे ते अनुभवाने चाखून बघ तुलाही सुख सापडेल.प्रगतीच्या फे-यात आपलेच मानसिक स्वास्थ हरवून बसलेल्या,मानवा।जागृत हो।जागृत हो।"

"आरोग्यसंपन्न,प्रदूषणाच्या छायेतून मुक्त झालेल्या संतुलित आणि सुखी जीवसृष्टीचे स्वप्न मी पहात आहे,मानवा।एक माता आपल्या पुत्रांकडून स्वप्नपूर्तीची अपेक्षा करीत आहे.आशेचा किरण शोधत आहे.होईल ना माझे स्वप्न पूर्ण?"

# अनघा

कु. वैशाली एडसीकर
तृतिय वर्ष वाणिज्य

डोळे तुझे झाकुन घे
परत परत उघडू नको
शीतलतेचं स्निग्ध चांदणं
असं सारखं सांडू नको.

नजरेपुढल्या प्रत्येकाला
असं हसून बोलू नको
सगळ्यांची नियत सारखी नसते
पुन्हा सांगायला लावू नको

पुन्हा पुन्हा पायातले चाळ
वाजवत तू चालू नको
पुन्हा पुन्हा गोड गळा
घुमवत तू गाऊ नको

सदा सोनेरी कांकणे वाजवत
इकडे तिकडे फिरू नको
सारखी तुझी नागवेणी
अंगाअंगावर झुलवू नको

आवारात वावरताना
सुगंध असा शिंपू नको
केवडयाची तुझी अंगकाठी
दृष्टावेल गं, लवू नको.

# छायावाद आणि महादेवी वर्मा

कु. वैशाली सुर्वे
१२ वी वाणिज्य

ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या महान् कवयित्री महादेवी वर्मा ह्या हिंदी साहित्यातील एक मानदंड ठरल्या आहेत. छायावादी कालखंडाच्या त्या एक प्रमुख आधार स्तंभ मानल्या जातात. भारत सरकारच्या पद्मविभूषण या किताबाने सन्मानित,हिंदी साहित्यातील आधुनिक मीरा म्हणून प्रसिध्द असलेल्या महादेवी अश्रूंच्या आणि वदनांच्या कवयित्री आहेत.

हिंदी साहित्याला ललामभूत ठरलेल्या या कवयित्रीच्या "यामा" या काव्यसंग्रहाला उपरोक्त ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले आहे.

तसे पाहिले तर 1942 मध्ये प्रकाशित झालेल्या या काव्यसंग्रहाची 43 वर्षानंतर म्हणजे उशिराच दाद घेतलेली दिसून येते. "यामा" काव्यसंग्रहात त्यांचे आधीच प्रकाशित झालेले चार काव्यसंग्रह एकीत्रत करण्यात आलेले आहेत. "नीहार" 1930,"रश्मि" 1932,नीरजा 1935 सांध्यगीत 1936 हे ते चार संग्रह असून त्यांतील एकूण गीतसंख्या 185 आहे. त्या काव्यसंग्रहात काव्यविषयांवर प्रकाश टाकणारी त्यांची स्वतःची चित्रे आहेत. चित्रकलेतील त्यांचे प्रभुत्वही वाखाणण्यासारखे आहे. त्यानंतर "दिपशिखा" हा काव्य संग्रह 1942 मध्ये प्रकाशित झाला "सप्तपर्णा" हा महादेवींचा अनुवादात्मक ग्रंथ असून त्यात वाल्मिकीपासून तर जयदेवापर्यंतच्या संस्कृत साहित्याचे निवडक अंश आहेत.गद्य साहित्यात 'अतीतके चलचित्र','स्मृती की रेखाएँ','श्रृंखला की कडियाँ','पथके साथी' इ. ग्रंथात व्यक्तिचित्रे,स्मृतिचित्रे लेख यांचा समावेश आहे. तीन चार तपाआधीचे हे काव्य असूनही नवसाहीत्याला जणू मागे वळून बघायला सांगत आहे. आपला शोध घ्यायला सांगत आहे की काय असे वाटते.

महादेवींचे काव्य ज्याप्रमाणे अंतर्मुखी व आश्रूंचे काव्य आहे त्याचप्रमाणे त्यांचे गद्य साहित्य सामाजिक कारूण्याने ओथंबलेले आहे. वेदना हा त्यांच्या साहित्याचा प्रमुख प्रेरणास्त्रोत आहे.हिंदीतील अनेक समीक्षकांनी या करूणेचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. डॉ.जयनाथ नलिन यांच्या मतानुसार महादेवींचे अयशस्वी व नष्टप्राय वैवाहिक जीवनच या कारूण्याच्या मुळाशी असावे. डॉ.नगेन्द्रांसारख्या महान टीकाकारानेही फ्राईडच्या चष्म्यातून महादेवींच्या साहित्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे.कुणाला त्या शुध्द रहस्यवादी कवयित्री वाटतात व ते त्यांना आधुनिक मीरेच्या स्वरूपात पाहतात तर काही छायावादी मानतात. त्यामुळे डॉ.इंद्रनाथ मदान यांना वाटते की,समीक्षकांनी त्यांच्या काव्यावर अन्याय केला असून आपापले दृष्टीकोन त्यांच्या साहित्यावर लादण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या वादाच्या घुमश्चक्रीत न पडता या महान काव्याकडे रसिकाच्या आस्वादात्मक भूमिकेतून पहाणेच अधिक योग्य ठरेल.

पू.महादेवींचा जन्म एका संपन्न पण सनातनी कुटुंबात 1907 साली झाला. वडिल श्री.गोविंद प्रसाद वर्मा हे फरीखाबाद येथील संपन्न व प्रतिष्ठित नागरिक होते. त्यांच्या माता हेमरानी देवी या आस्तिक व अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यामुळे महादेवीवरही बाळपणापासूनच अध्यात्माचे संस्कार झालेले दिसतात. मातेच्या मुखातून मीरेची पदे ऐकतांना हीच मीरेची वेदना त्यांच्या काव्यात नव्या स्वरूपात उफाळून आली असेल तर त्यात आश्चर्य कसले? मीरेने "पग घुंगरू बांधून पतीचा त्याग करून कृष्णालाच पती मानले व अलौकिकाशी नाते जोडले. त्याचप्रमाणे महादेवींनी अवघ्या अकराव्या वर्षी झालेला जुन्या परंपरेतील विवाह स्वसंमतीच्या अभावामुळे स्वतःच नाकारला. एकप्रकारे परंपरेला आव्हान देवून क्रांतीकारकत्व सिध्द केले.



परंपरेला झुगारूनच त्या संस्कृतात एम.ए झाल्या. त्याचप्रमाणे भगवान गौतम बुध्दांच्या तत्व ज्ञानाच्या जबरदस्त प्रभावामुळे बौध्द भिक्षुणी बनण्याचाही प्रयत्न केला पण घरातील लोकांच्या विरोधामुळे तो अयशस्वी झाला तरीही बुध्दांच्या करूणेचा फार मोठा प्रभाव त्यांच्या साहित्यावर पडलेला दिसतो. "रश्मी" च्या प्रस्तावनेत त्या म्हणतात,"लहानपणापासूनच भगवान बुध्दांविषयी आत्यंतिक श्रध्दा व प्रेम असल्याने त्यांच्या जगाला दुःखात्मक समजणा-या तत्वज्ञानाशी माझी आयुष्याच्या सुरूवातीलाच गाठ पडली."माणसांच्या जीवनाच्या क्षणभंगुरत्वापेक्षा त्यांना सृष्टीचे व त्या सृष्टीकर्त्या परमेश्वराचे वेड अधिक! या सृष्टीच्या अप्रतिम सौदर्यात डुंबावे की या मानवी जीवनातल्या दैन्याकडे पहावे असा प्रश्न त्यांना वारंवार पडलेला दिसतो.

देखू खिलती कलियाँ या
प्यासे सूखे अधरों को
तेरी चिर यौवन सुषमा
या जर्जर जीवन देखूँ ।

"सुविधा" या गीतात त्या पुन्हा विचारतात "कह दे माँ क्या अब देखूँ?" नील कमलांवरील डोलणारे दंवामौक्तिक पहावेत की म्लान चेह-यांवरील नेत्रातून पाझरणा-या गंगा यमुना पाहाव्यात . सुंगधाने भरलेल्या शीतल झुळुकांचा आस्वाद घ्यावा की आर्तांच्या दुःखांची निश्वासिते ऐकावीत. असा संभ्रम त्यांच्या कवितेत वारंवार दिसतो. एक धागा त्यांना विश्वाशी बांधून ठेवतो तर दुसरा धागा त्या अलौकिकाशी,प्रियतम परमेश्वराशी नाते जोडतो. करूणेनेच विश्वाशी आणि विश्वेश्वराशी नाते जोडता येते. अशी महादेवीची खात्री असल्याने त्या अश्रूंच्या कवयित्री होऊ पाहतात.

तसे पाहिले तर महादेवी अत्यंत सुखवस्तू कुटूंबात जन्मल्या आणि वाढल्या. त्यांना भेटणारे साहित्यिकही ग्वाही देतात की,त्यांच्या चेह-यावर अष्टौप्रहर हास्य विलसत असे. किंबहूना त्या बोलतांना हसतात अधिक बोलतात कमी मग त्यांच्या काव्यातील आक्रोश वैचारिक असावा का? असा प्रश्न पडतो. त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी वेदनामय असल्याने तशीच काव्यसृष्टीही निर्माण झाली असावी. म्हणून त्या "नीरभरी" दुःखकी बदली" बनतात. ती वेदना त्यांच्या जीवनात शाश्वत स्वरूपात येते. ती कसलीही भौतिक आकांक्षा धरीत नाही. 'दुःख'या कवितेत कांचन मृगाप्रमाणे भासणा-या गर्वाध्दत सुखापेक्षा सजल शामल दुःख त्यांना अधिक प्रिय आहे. सुख म्हणते "मै मधु हूँ,मुझसे क्या पतझर का नाता" मी वसंत आहे माझा या दुःखरूपी शिशिराशी संबंध काय? पण दुःख मात्र विश्वाशी आपले वैयक्तिक नाते जोडते.

त्यांच्या वेदनेच्या दुस-या स्वरूपाचाही विचार करणे आवश्यक आहे. बुध्दाच्या तत्वज्ञानाचा पगडा जसा कवयित्रीवर आहे तसाच अद्वैतवादाचा पण आहे. भारतीय तत्वज्ञानात जिवाचे शिवाशी, मायेचे ब्रम्हाशी,आत्म्याचे परमात्म्याशी घनिष्ठ व अतूट नाते सांगितले जाते. तोच विचार महादेवींच्या काव्यातूनही प्रकट होतानां दिसतो. महादेवीसारख्या आधुनिक मीरेने देखील हिंदीतील रहस्यवादी Mysticism साहित्यात मौलिक भर टाकली आहे. प्रेयसीची मीलनाची तडफड त्यांच्या ओळीओळीतून जाणवते. "नीरजा"(यामा) विरह वर्णन फारच प्रभावी आहे. तो प्रियकर (परमात्मा) प्रत्यक्ष तर भेटू शकत नाही. मग तो केवळ स्वप्नात का भेटेना फक्त एकदा, फक्त क्षणभरच, मग युगायुगाची मीलनाची तृष्णा तृप्त झाल्यावाचून कशी राहील?

"तुम्हे बाँध पाती सपनेमे"
तो चिरजीवन प्यास बुझा लेती उस छोटे क्षण अपनेमें ।

रीतीकालीन हिंदी कवींनी विरहावस्थेचे वर्णन करतांना इतका अतिरेक केला आहे की त्याला हास्यास्पदता प्राप्त होते. पण महादेवींच्या वेदना, बेदना असूनही सुखकर आहेत. कारण प्रियकरासाठी केलेल्या समर्पणातही अलौकिक आनंद आहे. अशी त्यांची धारणा आहे. त्या म्हणतात
चिंता क्या है हे निर्मम, बुझ जाय दीपक मेरा (प्राण), हो जायेगा तेराही पीडा का राज्य अंधेरा ।

स्थूल प्रियकराच्या बाह्य मीलनाला जनलज्जेची भीती व अडथळा आहे पण सूक्ष्माच्या आत्मिक मिलनात, कोण व्याघात उत्पन्न करू शकणार? या विरहावस्थेचे स्वरूप तर अखंड मीलनासारखे आहे. एका पद्यात त्या विचारतात,'विरह है या अखंड संयोग!'मग कवयित्रीला सायुज्येची, मुक्तीची गरज काय? या सायुज्यतेत परमेश्वर रूप व्हावे लागते मग या आत्मविलयात,अद्वैतप्राप्तीत "स्व" ला गमावून बसावे लागणार! तुकारामासारखे संत सुध्दा भक्ती-सुखासाठी अद्वैताऐवजी द्वैताला आणि स्थूलाला (देह रूपात प्राप्त करू इच्छितात) त्यामुळे अशी प्राप्ती काय कामाची? त्या म्हणतात "तुम्हाला प्राप्त करणे म्हणजे तुम्हालाच गमाविणे

आहे आणि तुम्हाला गमाविणे म्हणजे तुम्हालाच प्राप्त करणे आहे·

पाने में तुमको खोऊँ
खोने में तुमको पाना

असा मोठा मोहक विरोधाभास आहे हा· या त्यांच्या दुःखात माधुर्य भरणा-या त्या 'प्रिय'ला गमान्तील· मग करूणेत सौदर्य कोण भरणार?

" कौन तुम मेरे हृदय में?
कोन मेरी कसकमें नित
मधुरता भरता अलक्षित?"

आणि तो महादेवीचा अलौकिक प्रियकर परमात्मा आहे हे सांगायची वेगळी गरज काय? "यामा" काव्य संग्रहातील गीते अशी स्निग्ध,सुन्दर रसार्द्र आहेत· भावनांचे मनोहारी नर्तन व अप्रतिम शिल्प सौदर्य असलेल्या या गीतांमधील एक गीत रसिकांच्या आस्वादासाठी देण्याचा मोह आवरत नाही· भावना व कल्पनांचा मनोहर संगम, अद्वैताचीही प्रचीती·

नाशभी हूँ मै, अनन्त विकास का क्रम भी
त्याग का दिन भी, चरम आसक्ती का तम भी
तार भी, आघात भी, झंकार की गति भी
पात्र भी, मधु भी मधुपभी, मधुर विस्मृती भी
अधर भी हूँ और स्मितकी चांदनी भी हूँ
बीन भी हूँ मै तुम्हारी रागिनी भी ।
(निरजा, यामा)

उत्कट भावना,उन्नत कल्पना माधुर्य,तरलता व उत्कृष्ट रचना सौदर्याचा हा नमुना आहे·

केव्हा केव्हा मनात विचार येतो की, महादेवी दुरून डोंगर साजरे या न्यायाने वेदनांच्या रम्य रूपाकडे पाहातात की काय? दैन्याच्या वैफल्याच्या अपेक्षा भंगाच्या उपेक्षेच्या वेदना पोळणा-या व विषारी नागाच्या दंशापेक्षा अधिक प्राणघातक असतात· याचा प्रत्यय त्यांना आला असता तर त्यांना दुःखाचे इतके सुंदर रूप दिसले नसते· अथवा दुःखाच्या वास्तव जीवघेण्या स्वरूपाची दुसरी बाजूही त्यांनी रंगविली असती· त्यांच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास ती वेदना प्रतिक्रीयेच्या स्वरूपात येते," जग ज्याला दुःख आणि अभाव म्हणते त्यापासून मी खूप दूर आहे जीवनात माझे खूप कोडकौतूक झाले·मुबलक आदर व पुष्कळशा प्रमाणात सर्व सुखे मिळाली आहेत· भौतीक दुःखाची सावली जीवनावर पडली नाही· वेदना मला इतकी मधुर वाटते ही कदाचित त्याचीच प्रतिक्रीया आहे· असे "रश्मि"च्या प्रास्ताविकात त्या म्हणतात·

संगीताशी त्यांचा घनिष्ठ परिचय असल्यामुळे त्यांच्या काव्यातून संगीताचा प्रवाह वाहतांना दिसतो· त्यांच्या काव्यात कठोर वर्णाचा अभाव आहे· "ट" वर्गातील वर्ण अभावनेच दिसतात· "प व त" वर्गातील मृदुवर्णांचा व अनुनासिकांचा भरणा अधिक आहे· त्यामुळे त्यांची ही कोमलकांत पदावली गुणगुणाविशी वाटते· त्याचप्रमाणे त्यांच्या काव्यातील प्रतीके काव्याला आशय घनता देतांना दिसतात· सांग व निरंग रूपके,उपमा, समासोक्ती जागोजाग विखुरलेल्या आहेत· अनुप्रास तर अनायसेच आलेला आहे· "यामा" या काव्यसंग्रहाप्रमाणेच 'दीपशिखे'त ही रसिकांना भुरळ घालणारी सांग रूपके आहेत· सृष्टी आपल्या उपकरणांसह (उपादान) वसंत रजनीला कशी श्रृंगारते ते खालील सांग रूपकात पाहा·

"धीरे धीरे उतर क्षितिजसे आ बसंत रजनी
तारकमय नव वेणी बंधन
शीश फूलकर शशि का नूतन
रश्मीवलय सित घन अवगुंठन
मुक्ताहल अभिराम बिछा दे
चितवन से अपनी
पुलकती आ बसंत रजनी (नीरजा-यामा)

या गीतातील आरतीचे रूपक असेच आहे· "प्रिय मेरे गीले नयन बनेंगे आरती" या गीतात ही बहारीचे रूपक आहे· त्यांच्या उपमाही अत्यंत समर्पक व प्रभावी आहेत·

"अवनी अंबर की रूपहली सीपमें
तरल मोती सा जलधी जब कांपता"
- रश्मि

प्रतिकांमध्ये 'दीप' हे त्यांचे आवडते प्रतीक आहे· दीपशिखेतील बहुतेक कवितांमध्ये ते हटकून येते आणि वेगवेगळ्या संदर्भात येते· ते त्यांच्या "स्व" चे, आत्म्याचे प्रतीक आहे·मंदिरात सतत तेवणारी ज्योत (दीप) आत्म्याच्या एकाकी साधनेचे प्रतीक आहे·

"यह मंदिर का दीप इसे नीरव जलने दो"
असे त्या म्हणतात· त्याचप्रमाणे प्रवासी (यात्री) नदी,शिशु,जननी इ· प्रतिके उल्लेखनिय आहेत·

रसिकांनी मुक्तातच त्यांच्या काव्य सागरात



यथेच्छ अवगाहन करावे मग त्यांना दिव्यानंदाची हमखास प्राप्ती होईल· मात्र विश्वंभर "मानव" या सुप्रसिध्द साहित्यिकाच्या शब्दात सांगावयाचे तर, "उनके गीत चलती ट्रेनों,घूमती बसों और दौडती रिक्षाओं में नही पढे जा सकते· नही समझे जा सकते । वे एकांत में एकांत मनसे पढनेके लिए है ।" त्यांच्या मताप्रमाणे त्या असामान्य व्यक्तिमत्वाच्या लेखिका व अद्वितीय प्रतिभाशाली कवयित्री आहेत· भारतीय वाङ्मय इतिहासात त्यांना तोड नाही· अर्थात सर्वांनाच हे मत मान्य होईल असे नाही· तरी यातून त्यांच्या प्रज्ञेचा आवाका लक्षात यायला हरकत नाही·

# युवाचिंतन

**किशोर महाजन**
एम. कॉम. (सिनी.)

**अजाणता स्पर्श**
तीव्र विचारांची ज्योत
तुझ्या नजरेतून निघते
अजाणतेपणेच मनाला
स्पर्शून जाते·

**निर्दोष**
अर्धांगिनीला जाळून नराधम
निर्दोष सुटतो
लग्नासाठी पुन्हा दिमाखाने
बोहल्यावर चढतो·

**आयुष्याची ब्लू-प्रिंट**
आर्किटेक्ट जीवनाचा
माझा मीच आहे
ब्लू-प्रिंट आयुष्याची
सुंदर अचूक आहे·

**आक्रमकता**
जीवन सार्थक करण्यासाठी
आक्रमकता शिकावी लागेल
जे न्यायाने मिळणार नाही
ते हिसकावून घ्यावे लागेल·

**बेकारी**
आधीच कसतरी करून मी
भरतोय पोट
त्यातल्या त्यात रक्ताचा
बेकारी घेतेय एकेक घोट

**सवय**
व्यसन मला याचे की
मला व्यसन नाही
त्याचे असे की गुलामीची
मला सवय नाही·

**कविचे सामर्थ्य**
चंद्राची गोळी चघळत
ग्रहतारे मुठीत धरू
मंगळाला दाताने फोडून
पृथ्वीची शेंडी धरू

**धुंद**
धुंदीची माझ्या मला
पूर्ण शुध्द आहे
त्याचे असे की शुध्दीचीच
मला धुंद आहे

**इच्छा-शक्ती**
इच्छा-शक्ती तुझी
वज्रासम असावी
अखिल सूर्यमंडळाला
भेदून जावी·

**सुवर्ण-कण**
जीवनात अनुभवांचे
सुवर्ण-कण वेचित जा
हृदयाच्या सुवर्ण-कुपीत
हळूवार साठवीत जा·

**सर्वश्रेष्ठ**
भारतीय संस्कृती आपली
संपूर्ण जगात श्रेष्ठ आहे
गीता साम्यवादावरील
सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे

**विचार-सूत्र**
अरे ! किशोरांमध्ये लहान हो
महाजनांमध्ये हो महान
जीवन ऐसे खुशाल जग तू
विचार-सूत्राचे या ठेवून भान

**आभास**
आमचा आत्मविश्वास म्हाता-यांना
अहंकार भासतो
म्हणून त्यांचा आपल्याशी
सहकार मंदावतो

# एकाकी मी पडले

प्रमोद चौधरी
द्वितीय वर्ष वाणिज्य

दुपारी कॉफी घेतांना गंगाधर फार अस्वस्थ होता.विचारांमध्ये पूर्णपणे गढून गेला होता. शारदाला कधीपासूनच तो अस्वस्थ दिसत होता. परंतु आज शारदा पुढे आली व म्हणाली,"मला एक कळत नाही तुम्ही सतत काळजी केल्याने का परिस्थिती सुधारणार आहे.? रात्रभर चिंता करून, झोप घालवून प्रकृतीची नासाडी का म्हणून करून घेताहेत?अहो,तुमच्या अशा काळजी करण्याने का भावोजींना तावडतोब नोकरी मिळणार आहे?

राजेश ज्या कंपनीत काम करीत होता.ती कंपनी बंद पडून एक महिना उलटला होता. कंपनी पुन्हा सुरु होण्याचे कुठलेही चिन्ह नव्हते राजेश आज जरी बेकार होता.व मोठा भाऊ म्हणून गंगाधरने राजेशची सर्व जबाबदारी आपल्यावरच घेतली होती.

गंगाधरचे सारे जीवन कष्ट करण्यातच गेले. शिकण्याची जबरदस्त इच्छा असून देखील त्याला शिक्षण घेता आले नव्हते.तो दहावीत असतांनाच वामनरावांनातीन बहीणीच्या विवाहाची जबाबदारी भावाचे शिक्षण व थोडे फार कर्ज व शेतीचा व्याप मागे ठेऊन स्वर्गाची वाट धरली होती. त्यामुळे त्याला नाईलाजाने शाळा सोडावी लागली. इतक्या अल्पवयातच गंगाधरने ही सर्व जबाबदारी जिद्दीने पेलली होती.तिन्ही बहीणींचे व भावाचे लग्न करून दिले.इतके होईपर्यंत त्याच्या दोन मुली लग्नाच्या वयाच्या झाल्या होत्या. तरी सुध्दा आज आपल्या मुलींच्या लग्नापेक्षा राजेशचा संसार उभार करून देण्याची जबाबदारी त्याला महत्वाची वाटत होती.

वाढती महागाई,मुलींचे वाढते वय, तसेच राजेशचा विचार यामुळे साहजिकच त्याच्या प्रकृतीवर परिणाम झाला.डॉ. देसाईंनी,गंगाधरला रक्तदाब असल्याचे सांगीतले.आणि तेव्हा पासून शारदानेही धसका घेतला होता. शारदाला वाटत असे.गंगाधरने भाऊजींची काळजी करू नये. भाऊजी आपले चांगले-वाईट ठरविण्या इतके मोठे झालेले आहेत;परंतु गंगाधरचे एकच पालुपद-"अग,कितीही झाले तरी तो माझा छोटा भाऊ, त्यामुळे त्याला सुखी ठेवणे हे माझे कर्तव्य आहे. मीच जर त्याला झिडकारून लावले तर त्याला किती वाईट वाटेल?"यावर शारदा म्हणाली:"पण आपल्या माधुरीनेही विसावे पूर्ण केले आहे. तिला किती दिवस घरात ठेवणार? हा सुध्दा विचार करावयास हवा, तीचे झाले की पाठोपाठ सुनिता आहेच की।

महिन्याभरात गंगाधरने राजेशला दोन वेळा पैसे पाठविले होते. पैसे पोहचल्याचे जे त्रोटक पत्र राजेशने लिहलं. त्यात लिहलं होतं" महिन्या भराचा पगार थांबला आहे. तुझे पाठविलेले पैसे मिळाले, बरे वाटले. सौ.वहिनींना स.न.चि.माधुरी व सुनिताला आशिर्वाद" नागपूरला जाऊन आलेला गंगाधरचा मित्र सांगत होता की, कंपनी पुन्हा सुरु होणार नाही. सर्व कामगारांना मालकाने कायदेशिर नोटीसा दिलेल्या आहेत. आणि एक महिन्यात क्वार्टर रिकामे करून द्यावे लागणार आहे. इतकी बिकट परिस्थिती असूनही राजेश वा मंदाने एका पत्राने सुध्दा गंगाधरला काही कळविले नव्हते. जे समजले होते, ते सर्व असेच बाहेरून समजले होते. तरी सुध्दा गंगाधर एक सारखा राजेशच्या भविष्याबद्दल विचार करीत होता. आता तर तो लहान लहान गोष्टींवरूनही शारदा, माधुरी व सुनितावर चिडत देखील असे.

नोकरी लागल्यापासून राजेशचे एकही पत्र नव्हते. दोन-दोन वर्षे तो गंगाधर कडे येतही नसे. अगदी आई वा त्याचे समजल्यावरही फक्त तीन दिवस येऊन गेला. परंतु तोही एकटाच मंदाला त्याने बरोबर आणले देखिल नव्हते. नोकरीच्या काळात राजेशने प्रेमाने आपल्या पुतण्यांसाठी कधी एक रूपयाची रिबन देखोल आणली



नव्हती. "असं, अस्सं । म्हणजे रिबन मिळाली नाही म्हणून तू सांगितलंस होय माधुरी व सुनिताला केस बॉब करायला?" असे गंगाधर चिडून म्हणत असे.

सोमवारी नेहमीप्रमाणे शारदाची कामाची घाई चालू होती. माधुरीच कॉलेज सकाळचं होतं, कामे भराभर आवरायची होती. सुनिताला आठ वाजेला क्लासला पाठवून गंगाधरला डॉ.देसाईकडे चेकअप साठी न्यावयाचे होते. त्यामुळे काम लवकर आटपविण्याच्याच घाईत शारदा होती. परंतु गंगाधर अजून झोपला होता. शारदाने जेव्हा त्याला कॉफी ठेऊ कां? म्हणून विचारले तेव्हा गंगाधर म्हणाला अजून नको, माधुरी गेल्यावर निवांतपणे ठेव. साडे आठ वाजेला कॉफी घेऊन शारदा गंगाधरच्या बिछान्याजवळ गेली कॉफी तेथे ठेऊन पुन्हा कामात गढून गेली परंतू पाच-सात मिनिटानंतर सुध्दा गंगाधर उठला नाही. तसे बिछान्याकडे पुन्हा जात शारदा म्हणाली," अहो, उठा की लवकर, निवून जाईल ना कॉफी. व त्याला हलविण्यासाठी त्याच्या उघडया दंडावर तिने हात ठेवला आणि मात्र - - - - - - पुढच्याच क्षणी गंगाधरच्या निष्प्राण देहावर अंग टाकून तिने हंबरडा फोडला.

आणि त्याच वेळी नागपूरच्या'सुस्वप्न'कॉलनीत राजेशच्या मिठीतून सुटण्याच्या प्रयत्नात असलेल्या मंदाला राजेश म्हणत होता " लाख मोलाचा ठरला बरं का तुझा सल्ला, अग लॉटरीचं पाच लाखाचं पहिलं बक्षिस आपल्याला मिळालयं एवढं नुसतं कोणाला समजलं असतं तरी सुध्दा सारे नातेवाईक आपल्याला जळूसारखे चिकटले असते.मग शारदा वहिनींनी सुध्दा " भाऊजी तुम्हाला एकच मुलगा, मुलगी नाही तर आता एका पुतणीच्या लग्नाची जबाबदारी स्विकारून कन्यादानाचे पुण्य पदरात पाडून घ्या." असे म्हणून नसता बोजा आपल्या गळ्यात अडकविला असता. तू हे फार चांगले केलेस, की, लॉटरीबद्दल या कानाचे त्या कानाला कळू दिले नाहीस," हीच तर आम्हा बायांची खुबी आहे. तुम्ही नेहमीच म्हणतानां की, बायांना विचारशक्ती नसते. आता सांगा बर कोणाची विचारशक्ती प्रबळ ठरली?" राजेशच्या अजून जवळ जात मंदा म्हणाली.

# त्या रात्री मी स्पप्न पाहिले

निळकंठ खडके
मॅगेझिन सेक्रेटरी

त्या रात्री मी स्वप्न पाहिले
नयन कुणाचे भुलवून गेले…
चंद्र कोवळा जरा थांबता,
गंध तनुतून बहरून आला
पाऊल दारी का अडखळले…
निळे सावळे रूप तयाचे
प्रतिबिंबच ते जणू मनाचे
वा-यावरती स्वर आतुरले…
शब्द थांबले ओठावरती
भाव दर्पणी हरवून गेले…

# गीत

कु. सरला फिरके
प्रथम वर्ष विज्ञान

चैन पडेना जेव्हा पासुनी
झाली आमुची नजरानजर
गुप्त जहाला सखा तयाला
करा कुणीतरी बाई हजर…
मिठीत माझ्या काल, न आता-
मिठीत, फिरली कशी लहर
घडी घडी मज आठवतो तो…
त्याच्याविण ना जाय प्रहर….
किमया घडली ऐसी, याच्या-
प्रणयाने केलाच कहर
दिशा दिशांच्या कोप-यात
धुंडाळा त्याला शहर शहर…
अपयश मज या ऊपर
नसेल जर करणार कदर
प्रीत अमर माझ्यापुरती मी-
करीन मला द्या कुणि जहर…

# रामानुजन्

आभिजित कर्णिक
द्वितीय वर्ष शास्त्र

भास्कराचार्या नंतर जागतिक किर्तीचा भारतीय गणितज्ञ म्हणजे रामानुजन् होय. तंजावर जिल्हयात एरोड येथे रामानुजन् चा जन्म एका ब्राम्हण कुटुंबात झाला. घरची अत्यंत गरिबी होती. त्यांचे वडील कुंभकोणम् येथे कापडाच्या दुकानात कीर्दखतावणी लिहिणारे कारकून होते. त्याच गावातील मुन्सफ कोर्टात असलेल्या कारकुनाची मुलगी ही रामानुजन्ची आई. हया बाईना बरेच वर्षे मूल झाले नाही. म्हणून हया बाईंच्या वडिलांनी नामक्कल गावाच्या नामगिरी देवीची प्रार्थना केली. ही प्रार्थना फळास आली आणि रामानुजन्चा जन्म 22 डिसेंबर 1887 रोजी झाला.

वयाच्या पाचव्या वर्षी त्याला शाळेत घालण्यात आले. सातव्या वर्षी हयाची प्रगती एवढी झाली की त्यास कुंभकोणम्च्या टाऊन हायस्कूल हया माध्यमिक शाळेत दाखल करण्यात आले. तेथे त्यास शिष्यवृत्ती मिळाली. रामानुजन् स्वभावानें शांत आणि चिंतनशील होता. त्याची स्मरणशक्ती तीव्र होती. आपल्या वर्गमित्रांना नवीनवी प्रमेये आणि ठोकताळे सांगून तो चकित करीत असे. संस्कृत धातुरूपावली त्याला तोंडपाठ होती. दोनचे वर्गमूळ आणि "पायची" किंमत कोणत्याही दशांश स्थळापर्यन्त तो बरोबर म्हणून दाखवी. इंग्रजी सहाव्या इयत्तेत म्हणजे आताच्या दहावीत त्याने "कार" हया गणितज्ञाचे 'सिनॉप्सिस ऑफ प्युअर मॅथेमॅटिक्स्' शुध्द गणिताची संक्षिप्त उपपत्ती हे पुस्तक वाचून त्यातील विषय आत्मसात केला. त्यामुळे त्यास गणित विषयात संशोधन करण्याची स्फूर्ती मिळाली. पूर्ण संख्या घेवून त्याचे चौरस करण्यात तो पटाईत होताच. चौरसाच्या क्षेत्रफळा एवढे वर्तुळ कसे काढावयाचे या प्रश्नावर त्याने आपले लक्ष केंद्रित केले होते. आणि थोडयाच दिवसात पृथ्वीच्या विषुववृत्ताची लांबी किती असावी हयाविषयीचे गणित त्याने केले. त्याने काढलेल्या हया परिघाची लांबी इतकी बरोबर होती की त्यात केवळ काही फुटांचीच चूक होती. भूमितीचे क्षेत्र त्याला अपुरे वाटले म्हणून तो बीजगणिताकडे वळला. नामक्कलची नामगिरी देवी आपल्या स्वप्नात येते आणि आपणास गणितातील सूत्रे सांगते असे तो सांगे.

1903 साली वयाच्या सोळाव्या वर्षी तो शालांत परीक्षा पास झाला. त्यास ज्युनिअर सुब्रम्हण्यम् शिष्यवृत्ती मिळाली. गणित विषयाखेरीज दुस-या कोणत्याही विषयात त्याला राम वाटत नसल्याकारणाने तो कॉलेजची पहिल्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण होवू शकला नाही. त्यामुळे त्याने कुंभकोणम् सोडले. आणि नोकरीच्या शोधात तो मद्रासला गेला. मद्रास येथे कॉलेजच्या प्रथम वर्षाच्या परिक्षेस 1906 साली बसला. तो परिक्षेत पुन्हा अनुत्तीर्ण झाला. लागोपाठ दोनदा परिक्षेत अपयश आल्यामुळे कॉलेज शिक्षणा विषयी तो उदासीन बनला पण त्याने गणिताचा अभ्यास सोडला नाही. 1909 साली रामानुजन्चा विवाह झाला. आणि त्यास नोकरी करणे प्राप्त झाले.

त्याकाळी दिवाणबहादूर रामचंद्रराव हे गणिताचे शौकिन नेल्लोरचे कलेक्टर होते. नेलोर हे मद्रासपासून जवळजवळ 80 मैल लांब आहे. नोकरी मागण्यासाठी रामानुजन् त्यांच्याकडे गेला. या हुशार तरूणाला रामचंद्ररावांनी आपल्याकडे ठेवून घेतले आणि त्याला एखादी शिष्यवृत्ती मिळवून देण्याची खटपट चालविली पण ही खटपट अपयशी ठरली. दुस-याच्या घरी राहून फुकट खात बसणे रामानुजन्ला पसंत नव्हते म्हणून त्याने लौकरच रामचंद्ररावांचे घर सोडले नंतर त्याला मद्रासमध्ये बंदर विभागात कारकुनाची नोकरी मिळाली. नोकरी धरली म्हणून त्याने गणिताच्या अभ्यासाची हेळसांड केली नाही. त्याचा पहिला संशोधनपर लेख जर्नल ऑफ इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटी या नियतकालिकेत



1911 साली छापून आला. हयावेळी त्याचे वय तेवीस वर्षाचे होते. 1912 साली आणखी दोन लेख त्याने हयाच नियतकालिकेकडे पाठविले आणि त्याचबरोबर वाचकांकरिता काही कूटप्रश्नही पाठविले. यामुळे रामानुजन्ची थोडीफार माहिती लोकांना झाली.

रामचंद्ररावांप्रमाणे मद्रास इंजिनिअरींग कॉलेजचे ग्रिफिथ आणि बंदर विभागाचे अध्यक्ष सर फ्रॅन्सिस स्प्रिंग हयाच्या सहकार्याने आणि उत्तेजनाने रामानुजन्ला आपल्या संशोधन कार्यात गढून जाणे सुलभ झाले. रामानुजन्चे एक मित्र शेषू अय्यर हयांच्या सूचनेवरून रामानुजन्ने आपल्या संशोधन विषयी केंब्रिज ट्रिनिटी कॉलेजचे ख्यातनाम सदस्य आणि प्रख्यात गणितज्ञ प्राध्यापक हार्डी हयांना 16 जानेवारी 1913 साली पहिले पत्र पाठविले. हया पत्रामध्ये रामानुजन्ने मोठया विनम्रपणे स्वतःची ओळख करून देवून सोबत 120 निष्कर्ष काढून पाठविले होते.

त्याच्या मित्राच्या खटपटीमुळे इंग्लडला जाण्यासाठी रामानुजन्ला शिष्यवृत्ती मिळाली. रामानुजन्चे कुटुंब फारच जुन्या मताचे, सोवळ्या ओवळ्याबद्दल फारच कर्मठ. रामानुजनला परदेशात जाण्यास कोणी कुटुंबीय सुखासुखी परवानगी देईल असे वाटेना. पण याही अडचणीतून रामानुजनची सुटका झाली. रामानुजनच्या आईच्या स्वप्नात येवून नामगिरी देवीने तिला सांगितले की, मुलाला बेशक युरोपला पाठव त्याच्या मार्गात येवू नकोस त्यामुळे रामानुजन्ला केंब्रिज येथे जाण्यास हंसतमुखाने परवानगी मिळाली. मद्रास सरकारकडून त्याला अडीचशे पौंडाची शिष्यवृत्ती आणि ट्रिनिटी कॉलेजकडून साठ पौंडाची आणखी एक शिष्यवृत्ती मिळाली.

रामानुजन् काही ठराविक विद्यापीठीय चाकोरीतून अभ्यास करून तयार झालेला विद्यार्थी नव्हता. तो स्वतःच, स्वतःचा गुरु बनला होता, एकलव्यापेक्षाही त्याची तपश्चर्या मोठी होती. वाड्मयाबद्दल त्याला विशेष आवड नव्हती. परन्तु चांगले वाड्मय कोणते हे जाणण्याची पात्रता त्याच्या अंगी होती. तत्वज्ञानात त्याची गति चांगली होती. तो अतिशय कर्मठ होता. धर्मावर त्याची अढळ श्रध्दा होती. तरीपण सर्व धर्म सारखे आहेत असे त्याचे मत होते. तो संपूर्ण शाकाहारी होता. रोज अंघोळ करून स्वतःचे अन्न स्वतः शिजवून तो खात असे. जे जे म्हणून अनपेक्षित चमत्कारिक असेल त्याकडे तो आकर्षिला जावयाचा. मग तो विषय गणित असो वाड्मय असो की तत्वज्ञान असो.

1917 साली तो प्रथम आजारी पडला. उन्हाळ्याच्या सुरवातीस तो केंब्रीज नर्सिंग होम मध्ये दाखल झाला. यानंतर जवळजवळ दोन वर्ष पर्यंत तो ठिकठिकाणी हवापालट म्हणून विश्रामधामात राहिला. 1918 च्या हिवाळ्यात त्याची प्रकृती सुधारली. फिरून जोमाने तो अभ्यासाला लागला. या दोन वर्षात त्याने काढलेल्या निष्कर्षांची सत्यता गणिती जगाला पटलेली होती. त्यामुळे रॉयल सोसायटीचे सभासदत्व त्यास बहाल करण्यात आले. हा त्याचा मोठा गौरव होता. याच काळात ट्रिनिटी फेलोशिपही त्याला मिळाली. अंकगणित, बीजगणित, त्रिकोणमती, समीकरण सिध्दान्त हयात त्याची अद्वितीय गती होती. बीजगणितात डग्लस्-रामानुजन् आयडेंटिटी, हायपर जॉमेट्रिकल सेरिज आणि कंटिन्यूड फ्रॅक्शन असे अनेक शोध त्यांनी लावले. हा गणितज्ञ वयाच्या 33 साव्या वर्षी 26 एप्रिल 1920 साली क्षयरोगाला बळी पडला.

रामानुजन्च्या कार्याचे आणि पध्दतीचे मूल्यमापन करतांना प्राध्यापक हार्डी म्हणतात रामानुजन्ची विचारपध्दती इतर गणितज्ञांसारखीच होती. फक्त त्याची स्मरणशक्ती दांडगी होती. संख्यांचे गुणधर्म आणि त्यांच्यातील अन्योन्यसंबंध त्याच्या जिभेच्या शेंडयावर वास करीत. प्रत्येक घनपूर्णांक हा त्याचा जीवश्चकंठश्च मित्र होता. त्याची गणनशक्ती लोकविलक्षण आणि शीघ्र होती. गणनक्रिया झटपट करण्यात तो कुशल होता. रामानुजन् स्वतःच्या बुध्दीसामर्थ्यावर तयार झालेला गणितज्ञ होता. कल्पकता, चिकाटी हेच गुण त्याच्या उपयोगास आले. विद्यापीठीय शिक्षणामुळे त्याची कल्पकता, प्रतिभा यास योग्य वळण लागून ती अधिक प्रभावी ठरली असती काय? का विद्यापीठीय शिक्षणामुळे हे गुण सुप्तावस्थेत राहिले असते हे सांगणे कठीण ! कदाचित हया ठराविक चाकोरीतून गेल्यामुळे रामानुजन् हा रामानुजन् राहिला नसता. केवळ युरोपीय शिक्षण घेतलेला, तो एखादा गणिताचा प्राध्यापक म्हणून मिरवला असता आणि जग एका अभिजात गणित तज्ञाला मुकलेही असते.

# आजच्या युवकांची श्रद्धास्थाने

कु. विजया जोशी
तृतीय वर्ष वाणिज्य

" कोण होतास तू, काय झालास तू
अरे वेडया कसा वाया गेलास तू "

दुपारी ।। वाजता मुंबईवरील "कामगार सभा" या कार्यक्रमात काल हे गाणे लागले होते. त्यावेळी आमचे आजोबा म्हणतात कसे? "खरोखर आजची तरूण पिढी ही अशीच वाहावत चालली आहे. आमच्या काळी असं नव्हतं बुवा ! आम्ही काय शिकलो नाही का? पण ही असली थेरं नव्हती हो !" आजोबांच्या या वक्तव्याला मी लगेच प्रतिसाद दिला. मी म्हटले, " बरं का आजोबा,सगळीच मुलं काही अशी नाहीत हो! उगीच गव्हाबरोबर किडे रगडू नका." मग आजोबा म्हणाले," तेही बरोबर आहे पण एका सडक्या आंब्यामुळे सर्वच आंबे सडण्याची भीती असते ना!" यावरही माझे उत्तर तयार होतेच "अहो पण आजोबा तोच सडका आंबा जर आपण काढून टाकला तर इतर आंबे सडतीलच कसे?" शेवटी माझ्या या प्रत्युत्तराने आजोबांना निरूत्तर केले आणि आमचा वाद मिटला.

खरंच! जुन्या पिढीच्या मनात का कोण जाणे पण आजच्या युवकांविषयी गैरसमज निर्माण झालेला आहे. त्यांच्या मताप्रमाणे आजची तरूण पिढी सिनेमांमुळे बिघडली आहे. त्यांच्या आवडी निवडी भिन्न झाल्या आहेत. त्यांना आजकाल उडत्या चालीची आणि डिस्को गाणी आवडू लागली आहेत. कॉलेजमध्ये तर ही मुलं अगदीच बेशिस्त पणे वागतात त्यांना कॉलेज म्हणजे जशी काही धर्मशाळाच वाटते. वर्गाचे तास चुकवून या मुलांच्या झुंडीच्या झुंडी इकडे-तिकडे टवाळक्या करत फिरत असतात. शिवाय त्यांना मोठया माणसांविषयी आणि गुरूजनांविषयी अजिबात आदर उरलेला नाही. कारण त्यांची कशावरच श्रध्दा नाही.

बरं का मंडळी! हे मोठया माणसांचं म्हणणं जरी काही अंशी खरं असलं ना, तरी ते पूर्णपणे बरोबर नाही. कारण आता जमाना बदलला आहे. सगळ्या क्षेत्रांमध्ये सुधारणा घडून येत आहेत. त्यामुळे साहजिकच आजच्या तरूण पिढीच्या आवडीनिवडी जुन्या लोकांपेक्षा भिन्न आहेत. पण ज्याप्रमाणे हाताची पाचही बोटं सारखी नसतात त्याप्रमाणे काही तरूण याला अपवाद आहेतच. त्यांना जरी घरातील सत्य-नारायणाचे महत्व वाटत नसले तरी झोपडीतील सहभोजन खचितच महत्वाचे वाटते. याचे कारण अगदी उघड आहे. हल्ली सर्व प्रकारच्या माध्यमां मधून म्हणजे टी.व्ही.,रेडीओ वगैरेमधून त्यांना सामाजिक सुधारणेचे धडे दिले जातात.त्यामुळे कर्तव्यालाच आजची पिढी देव मानते. "कर्तव्य हाच परमेश्वर" हेच आजच्या युवकाचे बोधवाक्य आहे म्हणाना.

आज बहुतांशी मुलं जरी अयोग्य मार्गाकडे वळल्याचे चित्र समाजात दिसत असले तरी ती पूर्णपणे त्यांचीच चूक म्हणता येणार नाही. त्यांच्या पालकांचाही त्यात वाटा आहेच. केवळ योग्य मार्गदर्शनाच्या अभावी आज बहुतेक तरूण वाईट मार्गाकडे वळलेले दिसतात. त्यांना वाया गेलेली मुलं अशी पदवी मोठया माणसांकडून अगदी सहजगत्या बहाल केली जाते आपण त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देऊन त्यांनी स्वीकारलेल्या मार्गापासून परावृत्त केले पाहिजे. असे केल्याने यातील पुष्कळ मुले सुधारू शकतील व त्यांचा सामाजिक सुधारणेच्या कामी निश्चितच उपयोग होऊ शकेल. जुन्या पिढीचे असे मत होऊन बसले आहे की आजची तरूण पिढी ही अश्रध्द व नास्तिक आहे. म्हणजे त्यांचा देवावर विश्वासच नाही, पण ही समजूत साफ चुकीची आहे. "असेल माझा हरी तर देईल खाटेवरी" ही जुनी म्हण आता मागे पडली आहे. उलट "केल्याने होत आहे रे,आधी केलेचि पाहिजे" किंवा "उद्योगाचे घरी ऋध्दी सिध्दी पाणी भरी" या जुन्या वचनांवर देखील आजची पिढी विश्वास ठेवते व तसे आचरण करीत आहे.



आज पुष्कळ तरूण खेडयापाडयातून हिंडून प्रौढशिक्षणाचे आणि अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य करीत आहेत. त्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे खेडयांचा विकास होण्यास मदत होत आहे तसेच ही मुलं राष्ट्रीय एकात्मताही साधण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि सतीप्रथा, हुंडा पध्दती यासारख्या अनिष्ट प्रथांविरूध्द व भ्रष्टा-चार,दारूबंदी, स्त्रीमुक्ती यावरील दृश्ये गणेशो-त्सवात दाखवून समाज जागृती करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हीच त्यांची श्रध्दास्थाने आहेत. बाबा आमटयांच्या "भारत जोडो" मोहिमेत ते सहभागी होत आहेत हे त्यांच्यातील जागृतीचेच लक्षण नव्हे काय? आजच्या युवकांची श्रध्दास्थाने बदलेली आहेत.त्यांना पुराणातील देवावतारांपेक्षा महात्म्यांचा त्याग महत्वाचा वाटतो.कारणआजच्या काळात एखादा भगतसिंग, शिरीषकुमार किंवा शिवाजी निर्माण होण्याची गरज आहे. जयंत नारळीकरांसारख्या शास्त्रज्ञांची आणि शाम मानवां सारख्या अंधश्रध्दा निर्मूलकांची संख्या वाढणे आव-श्यक आहे. त्यादृष्टीने आजची पिढी अशा थोर महात्म्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आपली समाजाची, व परिणामी देशाची प्रगती करण्याचा प्रयत्न करीत आहे. पंढरीच्या विठोबाला न मानणारा युवक ज्ञानेश्वरी आणि तुकोबाची गाथाही वाचतो. त्याची तीर्थस्थानेही बदलेली आहेत. वैज्ञानिक प्रयोगशाळा,प्रचंडधरणे,उद्योगक्षेत्रे हीच त्यांची तीर्थ स्थाने बनली आहेत.संस्कृतीचा हा एक विशेष मानला जातो.

शतेषु जायते शूरः सहस्त्रेषु च पण्डितः ।
वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवति वा न वा ।।

या सुभाषितामधून दानाचे महत्व स्पष्ट होते.म्हणजे शंभरात एखादा शूर मनुष्य सापडेल, हजारात एखादा पंडित असेल, तर दहा हजार माणसांमध्ये एखादा वक्ता सापडेल पण दानशूर मनुष्य दुर्लभ आहे. दानाच्या बाबतीत कर्णाची ख्याती आपणास माहितच असेल. कर्णाने आपली जन्मजात लाभलेली आणि अंगरक्षक असलेली कवच कुंडले विपरीत बुध्दीने आलेल्या इंद्राला दान देऊन टाकली, म्हणजे दान देताना तो आपला शत्रू आहे किंवा मित्र आहे याचा सुध्दा त्याने विचार केला नाही. फक्त जो माणूस जे मागेल ते त्याला देणे एवढेच त्याला ठाऊक होते.आजच्या युवकाला अशा प्रकारच्या दानाचे महत्व वाटत नाही. त्याच्या दानाच्या कल्पना बदलल्या आहेत. त्याचा विश्वास रक्तदान,नेत्रदान यासारख्या दानांवर आहे. तो दाराशी आलेल्या भिका-याला कदाचित दान देणार नाही पण रेडिओवर किंवा टी.व्ही.वर एखादया रूग्णाला अमुक एका ग्रुपच्या रक्ताची गरज आहे असे कळल्यास व तोच रक्त ग्रुप असल्यास तो तरूण त्या हॉस्पिटलमध्ये लगेच धाव घेईल. याचे कारण म्हणजे भिका-याला दान दिल्याने आपण त्याच्या आळशी व काम न करण्याच्या वृत्तीला प्रोत्साहन देतो आणि त्याला ऐतखाऊ बनवतो असे आजच्या तरूण पिढीला वाटते. याउलट रक्तदान केल्यास "त्या" रूग्णाला जीवनदान दिल्याचे समाधान लाभते.तसेच पुष्कळ लोक आपल्या मृत्यूनंतर नेत्रदान करण्याची इच्छा आधीच बोलून ठेवतात. त्यामुळे अशा रितीने डोळे लाभलेल्या अंधाच्या जीवनाला वेगळेच वळण मिळाल्यामुळे त्याचे भवितव्य उज्वल बनू शकते.

अशा रितीने जर युवकांनी अनेक अडचणींवर मात करून देशाच्या प्रगतीला हात-भार लावला तर लवकरच भारत हे प्रगत देशांच्या मालिकेत जाऊन बसेल.

## रात्र

कु. सुनीता चिरमाडे
प्रथम वर्ष विज्ञान

हा धुंद सोनचाफा
केसात माळलेला
बेबंद पावसाळा रात्रीत दाटलेला
गात्रांस नेत्र फुटले,
तव रूप पाहण्याला
श्वासांतही तहान, ही प्रीत प्राशण्याला
गंधात या उसळत्या
मी आज धुंद व्हावे
हृद्‌बंध रेशमाचे हे मुक्तछंद व्हावे,
क्षण हाच दीर्घ व्हावा
जावी थिजून रात्र
मिटलेच हे रहावे अन्‌ तृप्त आज नेत्र

# तारा झाली उल्का

सतीश साळुंखे
तृतीय वर्ष शास्त्र

विश्वास न बसण्या सारखी घटना घडली । दिनांक 14 डिसेंबर 1986 रोजी चित्रपट रसिकांची लाडकी अभिनेत्री स्मिता पाटील हिच्या मृत्यूचे वृत्त सकाळी वा-यासारखे पसरले· भारतातील प्रत्येक घर हळहळले· चित्रपटाच्या क्षितीजावर शांतपणाने लखलखणारी तारका जणू उल्का होऊन कोसळली ।

भारतीयच नव्हे तर जागतिक चित्रपट सृष्टीच्या दृष्टीने 14 डिसेंबर हा दिवस एक काळा दिवस ठरला·

महाराष्ट्राचे माजी मंत्री श्री·शिवाजीराव पाटील यांची ती व्दितीय कन्या· जन्मजात अभिनय संपन्न असलेल्या स्मिताला अभिनयाचे धडे गिरवावे लागले नाहीत· अभिनयाचे औपचारिक शिक्षण तिने घेतलेले नव्हते· मुम्बई दूरदर्शनचा प्रारंभ स्मित वदना स्मिता च्या नमनाने झाला· तेव्हाच श्याम बेनेगल सारख्या दिग्दर्शकाने तिच्यातील अभिनय गुण टिपले आणि तिला "निशांत" मध्ये पहिली भूमिका दिली·तेव्हा पासून एका तपाच्या आत चंदेरी दुनियेतील अनेक मानसन्मानांची ती मानकरी ठरली· अभिनय नैपुण्याचे एकाहून एक सरस असे अविष्कार ती दाखवू लागली चित्रपट सृष्टीत तिने स्वतःचे असे खास स्थान निर्माण केले आणि त्या जोरावरच तिला "भूमिका" "चक्र" "उंबरठा" या चित्रपटातील भूमिकांबद्दल राष्ट्रीय आणि राज्य पुरस्कार मिळाले· तिला "पद्मश्री" ही सन्माननीय पदवी मिळाली· एवढेच नव्हे, तर जो बहुमान इंग्रिड बर्गमन, लिव्ह उलमन आणि मेरिल स्ट्रिप या सौंदर्य वती अभिनेत्रींनाच मिळाला तो बहुमानही तिने मिळविला । केवळ स्वतःचे गुण शोधत न बसता भूमिकांचे वैविध्य अनुभवणे स्मिताला आधिक मोलाचे वाटे· तिच्या प्रत्येक चित्रपटातील भूमिकेत विविधता होती·

"भूमिका" मधील अगतिक होत जाणारी अभिनेत्री "मंथन" मधील भांडखोर गवळण," चक्र" मधील अर्धावृत्त झोपडी निवासी अम्मा,"अर्धसत्य" मधील संवेदनाशील ज्योत्स्ना, "जैत रे जैत" मधील समाज बंधनांची कात टाळणारी ठाकर तरूणी "उंबरठा" मधील तिची भूमिका स्त्री मुक्तीसाठी चालना देणारी ठरली अशा कलात्मक चित्रपटातील भूमिकांद्वारे अभिनयाची विविध शिखरे ती गाठू लागली·सामाजिक आर्थिक, कौटुंबिक व भावनिक ओढगस्तीच्या गर्तेत सापडलेल्या स्त्री मनाचे प्रभावी चित्रण करण्यात ती अधिकाधिक यशस्वी होत गेली·सामाजिक ताण-तणावांचे भान असलेल्या स्त्रीचे चित्रण करण्यात तिला यश आले· त्याच्या मागे राष्ट्रसेवा दलाने तिच्यावर बालपणी केलेले संस्कार आणि मूळच्या बुध्दिमत्तेला प्रतिभेची मिळालेली जोड होती·

स्मिता एक उत्कृष्ठ अभिनेत्रीच नव्हे तर ती एक "नेक इन्सान" होती· सुनिल दत्तच्या "दर्द का रिश्ता" मधील भूमिका तिने कोणताही मोबदला न घेता स्वीकारल्यामुळे कॅन्सरग्रस्तांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळू शकली· ती माणुसकी असलेली अभिनेत्री होती·

स्मिता म्हणजे "उत्साहमूर्तीच" तिच्या अकाली निधनाने बहुविध भूमिकांचा ध्यास घेणारी गुणवती कलाकार आपणातून गेली· पण तिच्या कर्तृत्वामुळे चित्रपट इतिहासात तिचे स्थान अजरामर राहील·



# एकविसाव्या शतकातील इंधन 'हैड्रोजन'

किरण पाटील
१२ वी शास्त्र

॥ वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढती उर्जा समस्या व वायुप्रदूषण यांना यथायोग्य उत्तर ॥-

इंधनाचा प्रश्न दिवसेंदिवस अतिशय बिकट होत चाललेला आहे· गेल्या दहा वर्षात कोळशाचे उत्पन्न 2 टक्के वाढले आहे· नैसर्गिक गॅस व खनिज तेले यांचे उत्पादन 8 टक्क्यांनी वाढले आहे·1969 साली एकंदर उर्जेच्या 44 टक्के भाग खनिज तेलांपासून, 39 टक्के कोळशापासून व 17 टक्के नैसर्गिक गॅसपासून मिळत होता· यानंतर लोकसंख्येमध्ये जी भयानक वाढ झालेली आहे हे लक्षात घेता उर्जेची मागणी कित्येक पटीने वाढलेली आहे· लोकसंख्या प्रथम एक अब्ज व्हायला कित्येक हजारो वर्षे लागलीत· परंतु गेल्या पंधरा वर्षात त्यात खूपच वेगाने भर पडली आहे· 1850 साली लोकसंख्या 1 अब्ज झाली व 1930 मध्ये ती 2 अब्ज झाली नंतर मात्र फक्त 50 वर्षात म्हणजे 1980 ला ती 4·50 अब्ज व 1987 ला 5 अब्ज झाली· इ·स·2000 पर्यंत ती 7 ते 8 अब्ज असावी· हाच दर कायम राहिल्यास इंधनाचा प्रश्न खूपच बिकट होईल· अस्तित्वात असलेल्या खनिज तेले व नैसर्गिक वायूपासून आज एकंदर उर्जेच्या 61 टक्के भाग पुरविला जातो· ते साधारण 2010 पर्यन्तच पुरतील, तसेच कोळसा खाणींचा सुध्दा जास्त भरवसा नाही· नंतर मात्र उर्जेची समस्या अतिशय बिकट होईल·

परमाणु उर्जाः- 2 डिसेंबर 1942 रोजी अमेरिकन शास्त्रज्ञांनी युरेनिअम् 235 चे विभाजनामूळे उर्जा मिळू शकते हे दाखवून दिले· परंतु युरेनिअम 235 चा साठा खूपच म्हणजे फक्त 0·7 टक्के मर्यादित आहे· युरेनियम 238, थोरियम 232 वगैरेंचा उपयोग करता येईल, परंतु काही ठिकाणी इंधन हलके व तरल असणे आवश्यक असते· ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञ प्रा·जे·ओ·एस·बोकारिस यांचे म्हणणे असे आहे की,"परमाणु बीजघरामध्ये निर्माण होणा-या विजेचा उपयोग करून पाण्याचे विद्युत विच्छेदन करून हलक्या हैड्रोजनमध्ये रूपांतर करून नळाच्या सहाय्याने वितरण केंद्रावर पोहचविण्याची व्यवस्था करावी म्हणजे ज्याला गरज असेल तो हे इंधन घेऊन स्वतः वीज तयार करू शकेल·" यासाठी इंधन सेलचा उपयोग करावा लागेल· अशा प्रकारचे इंधन सेल्स चंद्रावर पाठविलेल्या अपोलो यानांमध्ये यशस्वी पणे वापरले गेले आहेत·

**हैड्रोजनच का?**

हैड्रोजनच्या व्यतिरिक्त इतर पदार्थांचा सुध्दा इंधन म्हणून उपयोग करता येईल, परंतु एकतर ते कमी प्रमाणात आहेत· व त्यांना मिळविण्याच्या पध्दती किचकट आहेत· अमोनिया सारखे पदार्थ जे आजही कारखान्यांमधून बाहेर फेकले जातात·, ते अतिशय दुर्गंधीयुक्त, कमी उष्णता निर्माण करणारे आहेत· विश्वाच्या उर्जा प्रश्नाचे उत्तर हैड्रोजनच सापडते·

**भविष्याची तयारीः-**

हैड्रोजन उत्पन्न करण्याच्या पध्दतींचा विकास प्रगतिशील देशांमध्ये व्हावयाला सुरूवात झालेली आहे· विद्युत विच्छेदनाने हैड्रोजन मिळविण्याच्या व्यतिरिक्त इतर पध्दतींवर सुध्दा विचार चालू आहे· रिॲक्टर मध्ये उत्पन्न झालेल्या उष्णतेचे विद्युत् उर्जेत रूपांतर करण्यापेक्षा सरळ वाफेचेच विच्छेदन करण्याचा प्रयत्न करावा· उदा·गरम धातूवर वाफ सोडल्यास धातूचे, ऑक्साईड मिळेल व बरोबरच हैड्रोजन सुध्दा मिळू शकेल·

**हैड्रोजन गुणाची कल्पना**

एकंदर परिस्थितीवरून असे वाटते की, पुढील शतकाच्या सुरूवातीलाच हैड्रोजनचा मोठया प्रमाणावर इंधन म्हणून उपयोग सुरु होईल· जर प्रगतीचा वेग अपेक्षेप्रमाणे राहिला नाही· व उर्जेचा व्यक्तिगत वापर आजच्यापेक्षा वाढला तर ही आकडेवारी धोका देण्याची शक्यता आहे· तेव्हा सन 2000 च्या आतच याचा वापर करावा लागेल· या संदर्भात आपली एक महत्वाची गोष्ट म्हणजे वायुप्रदूषणही खूपच कमी होईल व म्हणूनच हैड्रोजनचा इंधन म्हणून उपयोग लवकरच होईल·

शास्त्रज्ञ असेही म्हणतात की हैड्रोजनचा उपयोग सर्व बाजूंनी कल्याणकारी क्रांती घडवून आणील· हैड्रोजनचे विधुत उर्जेत रूपांतर करतांना पिण्याचे पाणी फुकटात मिळेल· हा सर्वात मोठा फायदा होईल· परिवहनात आगगाडया, मोटारी, जहाजे हैड्रोजनचा उपयोग करून चालविता येतील·व त्यामुळे प्रदूषणाचा प्रश्न जवळजवळ निकालात निघाल्यासारखाच होईल· विमानेसुध्दा द्रव हैड्रोजनवर चालू शकतील· व त्यामुळे एका माणसाचे हेलिकॉप्टर सुध्दा अस्तित्वात येतील· यात एक महत्वाचा भाग म्हणजे हैड्रोजनपासून डयुटेरिअम {जड हैड्रोजन} मिळणे हा होय, कारण याची "फ्युजन रिॲक्टर्स" साठी आवश्यकता भासेल· या सर्व प्रयोगांच्या यशाकडे मानवाचे लक्ष लागून आहे·

आताच पुणे येथे भरलेल्या राष्ट्रीय सायन्स कॉंग्रेसचे प्रदर्शनात हैड्रोजनवर चालणारी स्कूटर ठेवली होती· इतर वाहनांसारखाच वेग ही गाडी घेऊ शकते· हे सर्व जरी प्रायोगिक अवस्थेत असले तरी त्याला खूपच वेग दयावा लागणार आहे·

सौर उर्जा व हैड्रोजन पासून मिळणारी उर्जा यामुळे प्रदूषण संपुष्टातच येईल·

Necessity is the mother of Invension गरज ही शोधाची जननी आहे, या न्यायाने उर्जेच्या भयंकर गरजेपोटी असे प्रयोग होतच राहतील· व नवनवीन उद्गम शोधले जातीलच· परंतु " हैड्रोजनचा इंधन म्हणून वापर" याला पर्यायच नाही, अशी शास्त्रज्ञांची धारणा आहे·

उर्जा समस्येसारख्या ज्वलंत प्रश्नाची योग्य सोडवणूक केल्याशिवाय प्रगतीचा टप्पा गाठता येणे कठीण आहे·









# सफर

मनोज भांडारकर
द्वितीय वर्ष वाणिज्य

13 ऑक्टोबर 1987 हा काळाकुट्ट दिवस! जगद् विख्यात सुप्रसिध्द गायक "किशोर कुमार यांच्या जीवनाची सफर संपली ती या दिवशी संध्याकाळी पाच वाजून दहा मिनिटांनी ।। जुहू येथील त्यांच्या "गौरी कुंज" बंगल्यात हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचे प्राणोत्क्रमण झाले· ही चित्तथरारक बातमी ऐकून मनाला एक जोराचा चटका बसल्यासारखे जाणवले· खरोखरच । काय वाटले असेल त्यांचा चाहत्यांना ही बातमी ऐकून?

गोड गळा लाभलेल्या या गायकाचा जन्म खंडवा येथे 1930 साली झाला· त्यांच्या निधनाच्या वेळी त्यांचे वय केवळ 58 वर्षांचे होते· त्यांच्या मागे त्यांची पत्नी लीना चंदावरकर, मुले अमितकुमार व संदीप ही आहेत· चित्रपट सृष्टीतील नावाजलेले नायक अशोक कुमार व अनुप कुमार हे त्यांचे दोन भाऊ·आपले वडीलबंधू चित्रपट सृष्टीत गेल्यामुळे प्रथम पासून त्यांना चित्रपट सृष्टीत जाण्याची ओढ लागली·लहान वय असतांनाच त्यांनी चित्रपट सृष्टीत पाऊल ठेवले·प्रथमतः त्यांनी पुष्कळ चित्रपटात काम केले व त्यांचे ते चित्रपट गाजलेही काही काळानंतर वयाच्या अठरा व्या वर्षी त्यांनी गायनास प्रारंभ केला·

किशोर कुमार हे उत्कृष्ट गायकच नव्हते तर ते एक उत्कृष्ट कलाकार सुद्धा होते·त्यांनी प्रथमच चित्रपटांत काम केले ते "छम छमा छम" या चित्रपटात·ए·व्ही·एम·च्या"लडकी" या चित्रपटातील भूमिकेमुळे ते एक उत्कृष्ट हास्य अभिनेता म्हणून ओळखले जावू लागले·त्या काळच्या वेगवेगळ्या नटयांबरोबर त्यांनी "पहली झलक","नई दिल्ली आशा,मेमसाब"अशा वेगवेगळ्या चित्रपटातून कामे केलीत·त्यांचा सर्वात गाजलेला चित्रपट होता "चलती का नाम गाडी" व त्याची नायिका होती मधुबाला·त्यांनी काम केलेला चित्रपट "मनमौजी व त्यांनीच गायलेले त्यातील गाणे "जरूरत है जरुरत है,जरूरत है,एक श्रीमती की" हे मजेदार गाणे खूप हिट झाले होते·

स्वतः गाणे म्हणत असतांना त्यांना त्या गाण्याच्या चालीवर नाचायची सवय होती·त्यामुळे ते वेगवेगळे हातवारे करून इतरांना खूप हसवायचे त्यांच्याबरोबर गाणे म्हणत असणारे, गाणे म्हणता म्हणता चुकायचे व गाणे परत म्हणावे लागायचे त्यांच्यातला गंभीर माणूस कोणाला कधी कळलाच नाही·त्यांनी नायक किंवा सहनायक म्हणून एकूण 74 चित्रपटांत काम केले·

किशोरकुमार हे नायकला जुळेल असा स्पष्ट आवाज गाण्यातून देत असत·कोणताही नायक असो त्याच्या आवाजाला पूरक असा आवाज देण्याची कला त्यांना अवगतच होती·त्यामुळे किशोर कुमार यांच्या आवाजाचा उपयोग प्रत्येक संगीतकार आज पावेतो करत असे·एस्·डी·बर्मन यांचे ते खूप आवडते गायक होते·

आज किशोर कुमार यांच्या निधनामुळे देशाने एक अष्टपैलु अभिनेता गमावलेला आहे·या धक्क्याने चित्रपटसृष्टीतील अनेकांनी आपापली प्रतिक्रया व्यक्त केली आहे·किशोर कुमार यांचे भाऊ अशोक कुमार हे म्हणतात की,"माझा उजवा हात गेला असे मला वाटते"·वडिलांच्या पायावर पाय ठेवून मुलाने वागले पाहिजे·असे म्हटले जाते पण त्यांचे अगदी उलट होते·त्यांचे पिता कुंजबिहारी गांगुली हे बॅरिस्टर होते·पण किशोर कुमार हे एक नावाजलेले गायक झाले·आपली,आपल्या घराण्याची किर्ती त्यांनी सर्व जगात पसरवली·भारताला असा थोर कलावंत मिळविण्याकरिता वर्षानुवर्षे वाट पहावी लागेल·

दि·16 ऑक्टोबर 87 रोजी त्यांना त्यांच्या जन्मस्थळी खंडवा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले· त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांच्या चाहत्यांचा प्रचंड समुदाय तेथे उपस्थित होता·त्या प्रचंड समुदायातून आरोळ्या उठत होत्या·" किशोर कुमार अमर रहे".

शेवटी आपण ईश्वर चरणी हीच प्रार्थना करु या की,"ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो"!

" "जीवन के सफर में राही,
मिलते है बिछड जाने को ।
और दे जाते है यादें ।
तनहायी मे तडपाने को ।।"

# कवि आणि यमराज

एकदा कुण्या एका कविचा
किर्तीचा वाजू लागला डंका
स्वर्गात सुध्दा मग देवाला
आली म्हणे भलतीच शंका

देवही जाम चिडून सांगे
"यमराजाला बोलवा आता"
पृथ्वीवर काय चाललयं
शेफारली सारीच जनता"

एक कुणी सायासाच कवि
त्याच्याच मागे सारे धावती
भजने, किर्तनेही सोडून
नेहमीच त्याची गाणी गाती

यमराजही तापले खूप
म्हणती आवाजात करडया
"यमराज, काळजी नसावी
पाठवितो त्या कविस वेडया"

एवढे बोलून यमराज
तडक कविसमोर आले
हातातील वॉरंट देऊन
चलण्यास खुणाऊ लागले·

कवि हात जोडून बोलला,
"कृपा करा मजवरी देवा
आज तुमच्याकडून मला
एखादा चांगला "वर" हवा"

यमराजाने सांगून दिले
तसलं खातं आपलं नाही
"वर" आणिक बाकी सारेचं
काय आहे रे भानगडही·

कविने खूप केल्या विनंत्या
"आपण, राजी व्हा यमराज
देवाकडे तडक जाऊन
वशिला लाऊन दयाच आज·"

यमराजाला "हे" सर्व काही
अजून तरी नवचं होतं !
त्यानेही कानी हात ठेवले
आणि कविला समजाविले

"असली "ही" भलती लफडी
स्वर्गात तरी अजून नाही
तेथे नियम जुनेच आहेत
देवाला नसावी कल्पना "ही"

"यमराज, एक सुचवू का?"
पुसले कवि महाशयाने,
"स्वर्गात का हो होत नाहीत
आजकाल कविसंमेलने?"

बोलाविले होते देवानेही
संमेलनासाठी थोर कवी
देवाची गीते गाणे सोडून
गाईले "प्रियेचीचं" थोरवी

तेव्हापासून मग देवाने
केला मनी एकचं विचार
कुठल्याही कारणावरून
असली सभा नाही घेणार

तेव्हा कविंनीही केला मोर्चा
थेट इंद्राच्या बंगल्यावर
ठराव पास झाला म्हणे
देव भजनी रंगल्यावर·

तेव्हापासूनचं स्वर्गातही
होतात नेहमी संमेलने
देवाला खूष करण्यासाठी
होतात फक्त त्याची भजने·

"देवाला खूष करण्यासाठी
आपण गेलं पाहिजे स्वर्गी"
डोळे मिटून म्हणतो कवि
तोचं दोघेही, लागले मार्गी

"पुढे काय झाले?" विचारता
अहो, कळेल अजून तेही
त्याच, एकाच कारणासाठी
रवाना होऊ, आता आम्हीही

**किशोर पाटील**
बारावी शास्त्र



# हिमालयीन पानिपत

**देवेंद्र विसपुते**
प्रथम वर्ष कला

20 ऑक्टोबर 1962 रोजी हजारो वर्ष या पुण्यभूमीचे संरक्षण करणा-या हिमालयाला आमच्या गाफिलपणामुळे चीनसमोर नतमस्तक व्हावे लागले. "हिंदी-चिनी भाई भाई" आशावाद हवेत विरून गेला·या आक्रमणामुळे संपूर्ण राष्ट्र खडबडून जागे झाले·आपआपले मतभेद विसरून जनता एक झाली जनसंघाने आपली उ·प्रदेशातील चळवळ मागे घेतली. प्र·स·पक्ष,समाजवादी पक्ष,स्वतंत्र पक्ष व हिंदू महा सभा यांनी सरकारला विनाशर्त पाठिंबा दिला तरुणांनी सीमेवर जाण्याची तयारी दाखविली· राष्ट्रप्रेम जागृत झाले·भारतावर हल्ला होताच अमेरिका,इंग्लंड,कॅनडा इ·पाश्चात्य राष्ट्रांनी भारताला शस्त्रास्त्र मदत देण्याचा विचार सुरु केला·30 ऑक्टोबर रोजी ब्रिटीश पंतप्रधान मॅक्मिलन यांनी "भारत मागेल ती मदत देऊ" असे जाहीर केले·या सर्व जमेच्या बाजू असतांना आमचा पराभव का झाला?

**कमकुवत विदेशनीती:-** भारतीय परराष्ट्र-नीतीमध्ये दूरदृष्टीचा अभाव आहे·असा आरोप केला जातो·यथार्थता परराष्ट्रनितीचा पाया असला पाहिजे·स्वप्नरंजन नव्हे। जी राष्ट्रे आक्रमक असतात. ती आपल्या शेजारील राष्ट्रांच्या कमकुवतपणाचा शक्य तितका फायदा घेतात·चीनचा विस्तारवादी राष्ट्रवाद सरदार पटेलांच्या लक्षात आला होता·त्यांनी पं·नेहरूंना चीनच्या तिबेटविषयीच्या धोक्याची जाणीव करून दिली होती·1950 मध्ये चीनने तिबेटवर कब्जा केला_तेव्हाच भारताने चीनला लष्करी विरोध करायला हवा होता,कारण दुबळ्या राष्ट्राला मदत करणे भारताचे कर्तव्यच होते·परंतु त्यावेळी राज्यकर्त्यांना भारत-चीन मैत्रीची स्वप्ने (दिवसा) पडत होती भारताने 1954 च्या कराराद्वारे तिबेटवरचे खास हक्क सोडून दिले·व चीनला भारताच्या सीमेपर्यंत येण्याची संधी दिली·कारण त्यावेळी भारतीय नेतृत्व शांततामय सहजीवनाच्या कल्पनेत गर्क होते·

**संरक्षणाकडे दुर्लक्ष :-** तिस-या दशकात कॉंग्रेसने देशाच्या विकासाची पहिली योजना तयार केली·योजना समितीमध्ये पं·नेहरु व सुभाषचंद्र बोस होते·नेताजींनी सैन्याला योजनेत समाविष्ट केले तेव्हा नेहरु म्हणाले- स्वतंत्र भारताचे कोणाशीही शत्रुत्व नसेल, तेव्हा सैन्याची आवश्यकता नाही·महात्माजींच्या भारताला सैन्याची गरज नाही असेच मत राजेंद्रप्रसाद,विनोबा भावे· सी· राजगोपालाचारी इत्यादींचे होते·याचा अर्थ असा होता की सैन्यशक्तीवर राज्यकर्त्यांचा विश्वास नव्हता·सैन्याला राजनैतिक पाठबळ नव्हते·पर्यायाने सेनादले कमजोर झाली·

तिबेट व्यापल्यानंतर चीनने काश्मीरमध्ये लड्डाख हळू हळू व्यापण्यास सुरुवात केली·1956 पर्यंत चीन व भारतामध्ये कोणताही सीमातंटा नाही असे चीनने म्हटले होते·लड्डाखमधून चीनने एक रस्ता तयार केला तो सिकीयांग प्रांताला चीनच्या मुख्यभूमीशी जोडतो·भारताच्या प्रदेशात हे घडत असतांना भारताने त्याचा विरोध का केला नाही?

**आक्रमणाची पूर्वसूचना:-** 1959 मध्ये अॅडमिरल डी·शंकर हे जपानला गेले असतांना जपानी अधिका-यांनी महत्वाची सूचना दिली ती अशी रशिया व चीन यांच्या कुरबूरी वाढत असल्याने लवकरच रशियाची तेल निर्यात चीनला बंद होईल त्यामुळे ते त्यांना इतरत्र ठिकाणाहून मिळवावे लागेल· यासाठी चीन लड्डाख व नेफा क्षेत्रावर हक्क सांगू लागेल व संघर्ष उडाल्याखेरिज राहणार नाही·चिन्यांना बंगालच्या उपसागरातहि प्रवेश हवा आहे·याचा रिपोर्ट अॅड·शंकर यांनी आपल्या वरिष्ठांना केला·तरीही राज्यकर्त्यांनी युद्धाची तयारी का केली नाही? याचे आश्चर्य वाटते·

"ऑपरेशन लेगहॉर्न" चे कमांडर ले·जन·बी·एम कौल यांनी 1962 च्या शोचनीय परिस्थितीला तीन व्यक्तींना जबाबदार ठरवले·

1 पंतप्रधान नेहरू:- त्यांनी आपल्या नेतृत्वा खाली पराभव होऊ दिला.

2 कृष्णमेनन (संरक्षणमंत्री):- यांनी देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने काही गंभीर बाबतीत व समरप्रसंगात योग्य ती पावले त्वरेने उचलण्यास हयगय केली.

3 मो.देसाई (अर्थमंत्री) :- यांना संरक्षण विषयक गरजांसाठी पुरेसा पैसा उपलब्ध न केल्या बद्दल जबाबदार ठरवले.

आक्रमणाचा पहिला दणका बसताच ले.जन. कौल दिल्लीला पळाले.मे.जन.पठानिया व ब्रिगेडियर चीमा यांनी भर रणांगणातून पळ काढला.यामुळे सैनिकांच्या मनोधैर्यावर वाईट परिणाम झाला मनोधैर्यावरच (Morale) प्रत्येक लढाईचा अर्धा निर्णय अवलंबून असतो.या युद्धात 1383 सैनिक मारले गेले 1696 बेपत्ता झाले व 3968 युद्ध कैदी झाले.ब्रि.दळवी कैद झाले.व ब्रि.होशियारसिंग ठार झालेत.आपले उद्दिष्ट पार पाडल्यानंतर चीनने एकतर्फी "शांततामय" युद्धबंदी करार अंमलत आणला.

आजही भारताचा 17 000 चौ.कि.मी.प्रदेश चीनच्या ताब्यात आहे.90 000 चौ.कि.मी.प्रदेशावर चीन हक्क सांगतो आहे.परंतु तिस-या जगाचे नेतृत्व करणा-या भारताने गेल्या पंचवीस वर्षा पासून तो प्रदेश परत घेण्याचा एकदाही प्रयत्न केलेला नाही.शांततेच्या व वाटाघाटींच्या मार्गाने तो परत घेण्याची भाषा आजही केली जात आहे. कारण हिमालयाच्या बर्फावर रक्त सांडणा-या वीरांना आम्ही विसरलो आहोत.अजूनही शत्रूकडे असणारी भूमी आम्ही केव्हा मुक्त करणार? हा प्रश्न आहेच. जागतिक शांततेची जबाबदारी भारताच्या खांद्यावर आहे असा आमचा समज आहे परंतु राष्ट्रहिताकरिता या आदर्शवादाला मुरड घालण्यास हरकत नसावी.कारण

**शस्त्रेण रक्षिते राष्ट्रम् ।।**

## मृगजळ

सुंदर फूल गुलाबाचे
गेलो तोडावयाला
फूल गेले राहून
काटेच बोचले मला.
नजराणा स्वप्न तारकांचा
घेवून मी गेलो
तारका कोठे विखुरल्या
भग्न हृदयी होवुनी आलो.
वाळवंटात तहानेला मी
क्षितीजी आक्रंदीत गेलो
झरा समजुनी मृगजळाला
ऊर फाडुनि-जाळुनि बसलो

**संजय काळे**
१२ वी कॉमर्स

## सोबत

आता अखेर पावेतो..
पांढ-या केसांचीच..
क्षितिज सोबत
कुठेतरी एखादा
चुकार काळा केस
सगळीच पानं
पिवळी असली म्हणजे...
हिरव्याचं काही सुध्दा
वाटेनासं होतं..

**सुनील खडके**
तृतिय वर्ष कला



# युवकांची कैफियत

**राजेन्द्र व्यास**
एम. कॉम. (सिनी.)

**Youth is Nation** असे म्हटले जाते. युवक म्हणजे देशाचा आधार स्तंभ ! युवकांचे आचार-विचार,कार्य,आशा-आकांक्षा इ.चा देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासावर परिणाम होतो. आजचा युवक हा दिशाहीन झाला आहे.असे वारंवार प्रत्ययास येते.यांसाठी अनेक घटक जबाबदार आहेत.उदा.शासन,समाज,राजकीय घटक व स्वतः युवक वर्गसुद्धा.आजची शिक्षण पद्धती युवकांना सक्षम करण्यास असमर्थ आहे असे म्हटले जाते.कारण जेव्हा युवक पदवीधर होवून बाहेर पडतो,तेव्हा त्यास बेकारीच्या भस्मासुराशी सामना द्यावा लागतो.अत्यल्प रोजगारसाधनांची उपलब्धता व अफाट बेकारी यामुळे युवकांस वैफल्य येते. म्हणून शासनाने आपल्या शिक्षण पद्धतीत योग्य ते बदल करणे निकडीचे आहे.युवकांना,शिक्षण संपल्यावर स्वतःचा व्यवसाय,प्रकल्प अथवा धंदा सुरु करता येईल,असे शिक्षण देण्यात यावे युवकांनीही आत्मनिर्भर व्हावयास हवे.केवळ वरिष्ठ किंवा मध्यम दर्जाचे काम मिळावे असा अट्टाहास न ठेवता मिळेल ती नोकरी अथवा व्यवसाय स्वीकारण्याची तयारी त्यांनी ठेवावी.

दुसरा परिणामकारक घटक म्हणजे युवकांना शासनातर्फे विविध स्वरूपात मिळणारी मदत होय. हा देखिल युवकांना आत्मनिर्भर करण्याचा एक प्रभावी उपाय मानला जातो.परंतु त्यातही काही दोष आहेत.शासन वेळोवेळी युवकांसाठी योजना राबविते,परंतु त्यांचा पूर्ण लाभ युवकांपावेतो पोचवला जात नाही.यांस अनेक घटक जबाबदार आहेत.उदा.सदोष यंत्रणा,शासकीय अधिकारी,मध्यस्थ, स्थानिक राजकारण इत्यादी.शासनाने या योजना राबवितांना योग्य ती काळजी घ्यावी.

चित्रपट व्यवसाय व दूरदर्शन हे घटकही युवकांच्या समस्या वाढविण्यास जबाबदार आहेत "अश्लीलता,विध्वंसक वृत्ती,विनाश- प्रवृत्ती यांचा आदर्शच आजच्या चित्रपटांमध्ये व दूरदर्शनांच्या मालिकांमधून युवकांपुढे अप्रत्यक्षपणे येतो.त्यामुळे त्यांना नकळत यासर्व गोष्टींची अधिक जाणीव होते.वस्तुतः या माध्यमांचा उपयोग युवकांमध्ये नवचैतन्य राष्ट्रप्रेम,राष्ट्रीय वृत्तीचीं जोपासना आणि स्वकतृत्वाची जाणीव करून देण्या साठी झाल्यास ते अधिक योग्य नाही का ठरणार?

समाजाचा युवकांकडे पहाण्याचा दृष्टीकोनही बदललेला आहे"आजचा युवक हा विध्वंसक वृत्तीचा काहीसा संतप्त,व्यसनाधीन असा असल्याचे म्हटले जाते.परंतु प्रत्यक्षात मात्र तसे नाही.प्रत्येक युवक हा समाजाचा एक महत्वाचा घटक आहे.युवक त्याला म्हटले जाते की जो कोणत्याही संकटाशी अडचणींशी,समस्यांशी सामना देण्यासाठी सदैव सज्ज असतो.आपल्या अंगावर काळाची नवी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य त्याचेजवळ पूरेपूर असते.वैफल्य, निराशा त्याला कधी नाउमेद करू शकत नाही. त्याच्या साहसाला सीमा नसतात.युवकाचे हे वर्णन खरे असले तरी सामान्य युवकांना परिस्थितीच्या अन् व्यवहाराच्या काही मर्यादा असतात.आणि त्यामुळेच युवकांनाही कित्येकदा समस्यांच्या जंगलात अडकून रहावे लागते.युवक ही राष्ट्राची फार मोठी ताकद समजली जाते.देशाची ही फार मोठी असलेली ताकद अनाठायी खर्च होते,अक्षरशः वाया जाते.युवकांची ही ताकद विधायक कामासाठी वापरता आली तर एखादे राष्ट्र सर्वच बाबतीत किती सामर्थ्यवान बनू शकते,हे इस्त्रायलसारख्या एका छोटया राष्ट्राच्या उदाहरणाने दाखवून देता येईल.

युवकांच्या समस्या समजावून घेणे,त्यांच्या मानसिक अवस्थेचा अभ्यास करून त्यांची प्रचंड अशी शारीरिक आणि मानसिक ताकद विधायक कार्य क्रमासाठी मोठया कुशलतेने वापरून घेणे, अन् त्यांच्याशी देशातील ज्ञानी अनुभवी अन् दूरदर्शी अशा प्रौढांच्या पिढीचा संवाद साधणे ही आजच्या काळाची गरज आहे. युवकांनी आपल्या समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र संघटना स्थापन करणे जरूरीचे आहे.त्यामुळे त्यांना आपल्या समस्या सोडविता येतील आणि आपली शक्ती योग्य प्रकारे उपयोगात आणता येईल.त्यांच्यातून आदर्श नागरिक निर्माण होतील.पर्यायाने राष्ट्रीय विकासात वाढ होईल.याशिवाय शासन,समाज,सार्वजनिक संस्था इ.नी.संघटितरित्या प्रयत्न केल्यास युवकांच्या समस्या निश्चितच कमी होतील.

# हसा आणि मस्त रहा

महावीर जैन
द्वितीय वर्ष वाणिज्य

तुम्ही आश्चर्य व्यक्त कराल की हसण्याचा आणि चांगल्या प्रकृतीचा काय संबंध? खाण्याचा, व्यायामाचा,आसवांना,शुध्द हवेचा आणि स्वच्छ पाण्याचा वगैरेचा तर चांगल्या प्रकृतीशी संबंध असू शकतो·परंतु हसण्यासारख्या क्षुल्लक बाबीचा, ज्यामध्ये कोणाचा एक पैसा ही खर्च होत नाही· तिचा आणि मस्त राहण्याचा काय संबंध?

थांबा, असं करा····· तुम्ही सर्व कामे सोडून, हा लेख वाचणं सुध्दा थांबवून, एक वेळ मनमोकळे पणाने हंसा किंवा हसण्याचा प्रयत्न करा· आता पाहा ह्या नकली हसण्याने आपल्या मनावर आणि शरीरावर काय परिणाम झाला तो·! आपल्या चेह-यावर याचा शांती व आराम दायक प्रभाव पडला किंवा नाही?

हंसणे हे मानव जातीचे खास वैशिष्ट्य आहे· मनुष्याशिवाय इतर सर्व प्राणी शिकार करू शकतात, जेवण करू शकतात,एक दुस-यांवर प्रेम व्यक्त करू शकतात परंतू हंसू शकत नाही· ही अमूल्य देणगी फक्त मानवालाच प्राप्त झाली आहे· "व्यक्ती तितक्या प्रकृती" या उक्ती नुसार हसण्याकडे अनेक प्रकारे पाहिले जाते· हंसणे हे काहींच्या मते चांगले तर काहींच्या मते वाईट. हसले नाही तरी लोक त्याचा अर्थ काही तरी वेगळा काढतात. आणि हसले तर वेगळेचं काही तरी·· याचं उत्तम उदा. पुढील. प्रकारे देता येईल -

आमच्या कॉलेजचे एक प्राध्यापक आहेत· त्यांच्या जीवनाच्या डायरीत हसणे लिहिलेच नाही! तर दुसरे एक प्राध्यापक आहेत त्यांना केव्हा व कुठे हंसू येईल हे ते स्वतःही सांगू शकत नाहीत! असं कॉलेजचे काही विधार्थी म्हणतात·कुठे हसावे, कुठे नाही, हे आपले आपण ठरवावे· पण एकंदरित हसणे हे चांगलेच! त्याच्याने नुकसान तर नाही ना होत? परंतु विनाकारण हसले तर नुकसानच काय बरेच काही होते· याचा अनुभव कदाचित आपल्याला आला असेल·एंकदरित हंसणे हे चांगले. हो!पण हसणे म्हणजे काय हो?

हसणे म्हणजे काय? ह्याचे सर्वात समाधान कारक उत्तर आज पासून 400 वर्षांपूर्वी थॉमस हॉब्स यांनी दिले आहे· ते असे -"एकदम आनंदी किंवा प्रसन्न झाल्याने जे भाव चेह-यावर उत्पन्न होतात त्यालाच हसणे असे म्हणतात·

विनोद आणि हसणे- आपण हसू शकतो शिवाय त्याच्याने हे सिध्द होते की आपण बरे आणि वाईट यातील अंतर समजू शकतो·आमची मिळूनमिसळून राहण्याची वृत्ती हसण्या तून प्रकट होते·साधारणतः कोणत्याही विनोदाचा आनंद घेतांना कमीत कमी दोन व्यक्तींची जरूरी असते· एक सांगणारा वक्ता आणि दुसरा ऐकून हसणारा श्रोता· दोन अनोळखी माणसांना एक विनोद जवळ आणू शकतो·प्रवासात एखादा विनोद ऐकणा-यांना हसवतो आणि ऐकवणा-याची ओळख करून देतो· एखादी व्यक्ती आपले भाषण सुरू करतांना एखादा विनोदी किस्सा सांगून आपले बोलणे पुढे सुरु करते. कारण त्यात लोकांना हसवून त्यांची मने जिंकून घेण्याची क्षमता आहे· भारतीय जनता पार्टीचे नेते श्री·अटल बिहारी वाजपेयी जे देशातील सर्वोकृष्ट भाषण करणा-यामधील एक मानले जातात, ते सुध्दा आपल्या भाषणाच्या सुरवातीलाच ऐकण्या-यांना विनोदाने हंसवून मंत्रमुग्ध करून टाकतात·

चिंता चिते समान आहे असे म्हणतात· अत्याधुनिक जगात बरेचसे रोग चिंता आणि तणावानेच उत्पन्न झाले आहेत· हार्ट अटॅक,ब्लड प्रेशर इत्यादी रोगांचा मानसिक तणाव व चिंताशी जवळचा संबंध आहे·हसू निश्चितच चिंता आणि मानसिक तणाव इत्यादींना बरेच कमी करते· प्रसिध्द मनोवैज्ञानिक मॅथ्यूग्रीन यांनी सुध्दा सांगितले आहे की,"हंसा आणि मस्त रहा" हसल्याने गळ्याची व तोंडाच्या विविध भागाची हलकीशी मालिश होते· आणि आमच्या डोक्याची कार्य करण्याची शक्ती वाढते आम्हालाउत्साहाचा अनुभव येतो आणि हे चांगल्या प्रकृतीचे एक लक्षण आहे· हसल्याने मनावरील दडपण-ताण कमी होतो· आज मोठ मोठी सुशिक्षित माणसे सुध्दा मनावरील ताण कमी करण्यासाठी कित्येक प्रकारच्या औषधांचा उपयोग करतात·ज्यांचे अनेक वाईट परिणामही होतात· मनावरील ताण, दडपण कमी करण्यासाठी नाना प्रकारचे उपाय करण्याचा सल्ला दिला जातो· पण एवढे सर्व करूनही शेवटी परिणाम बहुतेक शून्यच असतो· परंतु जर आम्ही हसण्याला दैनंदिन जीवनातील एक अंग बनवून घेतले तर ब-याच प्रमाणात दडपणापासून मानसिक तणावापासून दूर राहता येते· हंसणे डोक्यात नको असलेले विचार दूर करू शकते·

मुलांना तर आसू सारखे हंसू सुध्दा लवकर येते· जसजसे आपण मोठे होत जातो· तसतसे आपल्या मनातील विचारावर निर्बंध घालण्यास शिकतो· हसण्यांवर सुध्दा आपण नियंत्रण करण्याचे शिकतो आपल्या विचारांना नियंत्रणात ठेवण्याचे शिकणे चांगले आहे परंतू यांचा अतिरेक झाल्यास हसणेंच विसरून जातो· तसे पाहता सध्या तरी सर्वांचेच जीवन नानाविध प्रकारच्या वाईट सवयी आणि गैरसमजुतींनी भरलेले आहे·तरी पण योग्य वेळी त्यांना सुधारण्याचा व त्यांच्या जीवनातील वाईट सवयी,व्यसन आणि गैरसमजुती दूर करण्याचा प्रयत्न केला जाणे आज जरूरीचे होवून बसले आहे· हसणे हे ह्याच्यात एक महत्वपूर्ण मध्यस्त आणि औषधांचे काम करू शकते· प्रसिध्द फ्रेंचतत्वज्ञ शैफर्ट ह्यांच्या ह्या ओळी नेहमी आठवणीत ठेवल्या जातील तर फारच चांगले होईल·
" मी त्याला जीवनातला सर्वात वाईट दिवस समजतो की,
ज्या दिवशी मला हसू आले नाही·"

## "चटक"

शस्त्राला रक्ताची असते-
तशीच,
रक्तालाही चटक लागली आहे-
शस्त्रांची, लाठयांची, गोळ्यांची
तेव्हाच तर·····
अस्मितेला जागून,
पाठीवर तिरडया बांधून
रणांगणावर,
देहाचे सार्थक करायला
निघताहेत--
जथ्थ्या मागून जथ्थे
उदिष्ट पूर्तीसाठी

मुकुंदा सैंदाणे
द्वितीय वर्ष कला

## स्मृती

बुडणारे एक जहाज मी होतो
बुडता बुडता तू मला भेटलास
म्हणून मी तग धरली
लाटांशी टक्कर दिली
आपल्यात सामावून मला
किनारा तुझा मला मिळाला
आत शिरलेले पाणी निघून गेले
उरातले वादळ सागरात गडप झाले
आता बुडण्याचे भय नाही मला
ठेवीन माझ्या स्मृतीत सदोदित तुला

नितीन नेमाडे
अकरावी शास्त्र

# स्त्री मुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले

कु. मनिषा महाजन
एफ्. वाय. बी. कॉम्.

स्त्री मुक्ती आंदोलनाच्या पहिल्या प्रणेत्या सौ.सावित्रीबाई फुले यांचा जन्म 3 जानेवारी 1831 रोजी सातारा जिल्हयातील नायगाव येथे झाला. इनामदार घराण्यातील खंडोजी नेवसे पाटील यांचे ते पहिले अपत्य होते.त्या काळातील पध्दतीनुसार त्यांचे लग्न नवव्या वर्षी तेरा वर्षांच्या ज्योतीराव फुले यांच्याशी झाले आणि त्यांचा जगावेगळा संसार सुरु झाला. एका वादळी व्यक्तिमत्वाच्या झुंझार माणसाबरोबर त्यांचा जीवनप्रवास सुरु झाला. जोतिबांचे क्रांतिकारक धगधगते विचार पेलणे व ते आचरणात आणणे हे ये-यागबाळ्याचे काम नव्हते. सावित्रीबाई तरीही ते करु शकल्या. त्यासाठी त्यांना परंपरा वादी प्रवृतींशी व सनातन्यांशी सतत संघर्ष करावा लागला. त्यांच्यामागे स्वतंत्र प्रज्ञा, प्रतिभा आणि ज्ञान लालसा होती म्हणूनच त्या हे काम करु शकल्या.

सावित्रीबाई ह्या एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेल्या बुध्दिवान महिला होत्या. ज्योतिबांची केवळ पत्नी म्हणून त्या श्रेष्ठ ठरत नाहीत तर ज्योतिबांप्रामाणे त्यांनाही दीनदलितांचा कळवळा होता. म्हणूनच असामान्य धैर्याने त्या समाजाच्या प्रखर विरोधाला तोंड देऊ शकल्या. परंपरेविरुध्द बंड पुकारु शकल्या.त्या केवळ सांग-काम्या शिक्षिका असत्या तर समाजाच्या छळाला कंटाळून त्यांनी फक्त घराचा संसार सांभाळला असता. पण त्याही जिद्दी जोतिबाप्रमाणेच करारी व द्रष्टया असल्याने त्यांनी जगाचा संसार आपला मानला. सनातन्यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणा-या पुणे शहरात स्त्री शिक्षणाचे व दलितोध्दाराचे कार्य करतांना या पतिपत्नींना अपार कष्ट करावे लागले. ऐन तरुण वयात शिक्षिका म्हणून काम करतांना सावित्रीबाईला जो छळ व विटबंना सहन करावी लागली त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

ज्योतीराव हे बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. " लोका सांगे ब्रम्हज्ञान आपण मात्र कोरडे पाषाण." ही नीती त्यांना मान्य नव्हती. म्हणून त्यांनी सुधारणेला प्रारंभ घरातून केला. स्त्रीच्या दृष्टीने अंधारयुग ठरलेल्या त्या काळातून त्यांनी वाट काढली. सावित्रीबाई आणि ज्योतीबांची मावसबहीण सगुणाबाई क्षीर-सागर ह्या ज्योतिबांच्या प्रयोगशाळेतल्या पहिल्या विद्यार्थिनी होत्या. शेतातील मातीची पाटी व झाडाच्या फांदीची पेन्सील करून त्या दोघींनी मुळाक्षरे गिरवली.गणित,शास्त्र,भाषा यांचे प्राथमिक ज्ञान मिळविले. नंतर त्यांनी ख्रिश्चन मिशनरी मिचेलबाई यांनी चालविलेल्या नॉर्मल स्कूल मधून अध्यापनाचे प्रशिक्षण मिळवले.

त्याच सुमारास ज्योतिबांचे शिक्षण संपले होते. ते मुलींची शाळा सुरु करण्याच्या तयारीत होते. विनावेतन काम करणारा दुसरा शिक्षक उपलब्ध होत नाही हे पाहून त्यांनी आपल्या पत्नीची योजना मदतनीस म्हणून केली. आणि 1 जानेवारी 1848 रोजी बुधवार पेठेतील भिडे वाडयात पहिली मुलींची-शाळा सुरु केली. 1822 मध्ये मुंबईला मुलींना शिक्षण देणा-या शाळा ख्रिस्ती मिशन-यांनी काढल्या होया. खुद्द पुण्यात देखील मिस् कुक यांनी 1930 मधे मुलींची शाळा काढली होती. त्यावेळी त्या शाळेत 4 ब्राम्हण 1 धनगर, 1 मराठा अशा 6 मुली शाळेत हजर होत्या.

ज्योतिबांचे वडील गोंविदराव यांच्यावर सामाजिक दडपण आले. आणि त्यांनी मुलाला व सुनेला घरा बाहेरचा रस्ता दाखविला.सास--याची मर्जी सांभाळायची की पती आज्ञा पाळा-यची अशा द्विधा मनःस्थितीत सावित्रीबाईंनी पतीच्या पावलावर पाऊल टाकून घराबाहेर पडणे पसंत केले. पतीच्या कार्यात त्या पूर्णतः समरस



झाल्या. ज्योतिबांच्या काळातील दुस-या कोणत्याही समाजसुधारकाने आपल्या समाजसेवेच्या कार्यात तो पर्यंत आपल्या पत्नीला सहभागी केले नव्हते. लोकहितवादी,न्या. रानडे, बाळशास्त्री जांभेकर ह्या उच्च वर्णीय सुधारक व्यक्ती सरकारी नोक-यांमध्ये मोठी अधिकारपदे भूषवित होत्या. त्यांना जनमानसात प्रतिष्ठा होती पण तरीही त्यांच्या स्त्रिया घरचा सुखासमाधानाचा संसार सोडून बाहेर पडल्या नव्हत्या. सावित्री बाईंनी ते धैर्य प्रथम दाखविले. म्हणून त्या भारतातील स्त्री मुक्ती आंदोलनाच्या आद्य जनक ठरतातत.

सवित्रीबाई या केवळ शिक्षिका नव्हत्या तर शिक्षणतज्ञही होत्या. त्या परीस्थितीतून व समाजा-तून मुले येतात त्या परीस्थितीचा बरावाईट परिणाम त्यांच्या शिक्षणावर होत असतो. असा सिध्दांत त्यांनी सांगितला होता. 'काव्यफुले' ह्या संग्रहात त्यांनी शिक्षणाचे महत्व सांगितले आहे. त्या म्हणतात.-

"शूद्रांना सांगण्याजोगा । आहे शिक्षणमार्ग हा ।
शिक्षणाने येते मनुष्यत्व । पशुत्व हटते पहा।"

स्त्री शूद्राची सेवा हीच सावित्रीबाईंनी ईश्वरसेवा मानली. 1897 सालच्या प्लेगमधे सत्यशोधक समाजाने सेवाकार्य सुरु केले.सावित्रीबाई व त्यांचा मुलगा यशवंत हे प्लेगच्या रोगावर उपचार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. एका प्लेग झालेल्या महार मुलाला खांदयावरून दवाखान्यात नेत असतांना सावित्रीबाईनाही प्लेगची लागण झाली.आणि 10 मार्च 1897 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या कार्याचे मूल्य मापन करतांना धनंजय कीर म्हणतात,"पांडित्य आणि प्रतिभा असलेली सावित्रीबाई, प्रतिभाशाली कवयित्री, उत्तम अध्यापिका,निःस्वार्थी समाजसेविका व फुल्यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे नेतृत्व करणा-या महान नेत्या होत्या."

## प्रीत

भेटीत तुझ्या हा पसरे प्रीत सुगंध !
चांदणी तूच अन् प्यासा मी हि चकोर
हा नल·· तव दमयंतीचा चोर ।
या संध्यासमयी हरपुन जाई भान !
अन् कातर वेळी उमले हा निशिगंध
भेटीत तुझ्या या पसरे प्रीत सुगंध
स्पर्शात तुझ्या अन् होई जीवन धन्य!

वासंती खडके
तृतीय वर्ष वाणिज्य

# जांगड्या धोबी

अनील महाजन
प्रथम वर्ष वाणिज्य

गावातील एक विलक्षण व्यक्ती·नदीच्या काठी त्याचे घर आहे·मातीचेच पण मोठे आहे·घराला बारा महिने सर्दीचा त्रास·जणू काही जांगड्याच्यो वाटेची सर्दी त्याच्या घरानेच मागून घेतली। आपले गावभर गप्पा छाटत फिरणे त्याने ठगाई च्या सांगण्यावरून कमी केले·व मुसलमान मोहल्ल्या तील उर्दू शाळे जवळील नदीकाठी भट्टी लावायला सुरुवात केली·

